रविवार
०५
जुलै २०२६

वर्ष १९ वे
अंक - १६२
पाने - ०८
किंमत - ५ रूपये

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25



## आरोटे हॉस्पिटल
आता नूतन स्वरूपात स्थलांतरीत होत आहे

सस्नेह निमंत्रण

# शिवम
## मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

या नूतन लोकसेवेचा
## लोकार्पण सोहळा
शुभहस्ते : आजी - आजोबा

रविवार, दि. ५ जुलै २०२६ । सकाळी १०.३० वाजता

ठिकाण – फ्लोरा टाऊनशीप, SMBT डेंटल कॉलेज समोर, पुणे–नाशिक हायवे, राजपाल सुपरशॉपी मागे, **घुलेवाडी,** संगमनेर

### सन्माननीय मान्यवर

**लोकनेते मा. बाळासाहेब थोरात**
मा. महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा.आ. अमोल खताळ पाटील**
आमदार, संगमनेर विधानसभा

**मा.आ. सत्यजीत तांबे**
सदस्य, विधान परिषद, महाराष्ट्र राज्य

**मा.आ.डॉ. किरण लहामटे**
आमदार, अकोले विधानसभा

**मा.सौ. मैथिलीताई तांबे**
नगराध्यक्षा, संगमनेर नगरपरिषद

**मा.श्री. वैभव पिचड**
मा. आमदार, अकोले विधानसभा

**मा.श्री. सिताराम राऊत**
मा. सदस्य, जिल्हा परिषद, अ.नगर

**ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख**
समाज प्रबोधनकार

**मा. श्रीमती निर्मलाताई राऊत**
सरपंच, ग्रामपंचायत घुलेवाडी

**ब्र.कु. राजयोगिनी नलिनी बहेनजी**
संचालिका, मीरा सोसायटी, पुणे

**मा.डॉ. योगेश गेठे**
अध्यक्ष, IMA, संगमनेर

**मा.डॉ. राजकुमार जहन्हाड**
वैद्यकीय अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय, घुलेवाडी

**मा.डॉ. कामेश टावरे**
तालुका वैद्यकीय अधिकारी, संगमनेर

**मा.डॉ. संदीप कचेरिया**
वैद्यकीय अधिकारी, ग्रामिण रुग्णालय, घुलेवाडी

### उपलब्ध सुविधा

- जनरल मेडिसिन
- जनरल सर्जरी
- ऑर्थोपेडिक्स
- कार्डिओलॉजी
- गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी
- नेफ्रोलॉजी व युरोलॉजी
- न्यूरोलॉजी
- कॅथलॅब (नियोजित)
- पॅथोलॉजी लॅब
- डिजिटल एक्स-रे
- एन्डोस्कोपी
- सोनोग्राफी
- सी. टी. स्कॅन (नियोजित)
- न्यूरोसर्जरी


५० बेडचे सुसज्ज मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल


सुसज्ज ऑपरेशन थिएटर

24 HOUR SERVICE

### निमंत्रक

सौ. विद्या व इंजि. रामनाथ दशरथ आरोटे
डॉ.सौ. स्वप्नाली व डॉ. अतुल रामनाथ आरोटे
डॉ.सौ. स्नेहल व डॉ. अंकुश रामनाथ आरोटे
सर्व डॉक्टर्स व कर्मचारी वृंद
(आरोटे हॉस्पिटल, ताजणे मळा, संगमनेर)

• ठिकाण •
फ्लोरा टाऊनशीप, SMBT डेंटल कॉलेज समोर, पुणे-नाशिक हायवे, राजपाल सुपरशॉपी मागे, घुलेवाडी, संगमनेर, जि. अहिल्यानगर



पेजिनेशनसाठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर



लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

# शाळा परिसरात 'स्टिंग'सह उच्च कॅफिनयुक्त एनर्जी ड्रिंक्सना बंदी

## आ. सत्यजीत तांबे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश



### तांबे यांच्या पाठपुराव्याचा प्रवास

१२ जुलै २०२४ : पावसाळी अधिवेशनात प्रथम मुद्दा उपस्थित.
११ सप्टेंबर २०२४ : अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांना पत्र देऊन बैठकीची मागणी.
२३ जानेवारी २०२५ : मंत्री नरहरी झिरवळ यांच्या उपस्थितीत बैठक.
२९ जानेवारी २०२५ : एनर्जी ड्रिंक्सवरील धोरण, जनजागृती आणि सविस्तर चर्चा.
१ जुलै २०२५ : पावसाळी अधिवेशनात पुन्हा बंदीची जोरदार मागणी.

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शाळकरी विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेत शाळांच्या ५०० मीटर परिसरात 'स्टिंग'सारख्या उच्च कॅफिनयुक्त एनर्जी ड्रिंक्सच्या विक्रीवर बंदी घालण्याचे निर्देश दिले आहेत. हा निर्णय प्रत्यक्षात येण्यासाठी विधानपरिषदेतील आमदार सत्यजीत तांबे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे.

आमदार तांबे यांनी गेल्या दोन वर्षांपासून विधानपरिषदेत वारंवार हा मुद्दा उपस्थित करत शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाढत्या प्रमाणात होत असलेल्या उच्च कॅफिनयुक्त एनर्जी ड्रिंक्सच्या सेवनाबाबत गंभीर चिंता व्यक्त केली होती. आकर्षक पॅकेजिंग आणि सहज उपलब्धतेमुळे विद्यार्थी अशा पेयांकडे आकर्षित होत असून त्याचा त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी सभागृहात ठामपणे मांडले होते.

केवळ प्रश्न उपस्थित करून न थांबता त्यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाकडे पत्रव्यवहार केला, मंत्र्यांच्या उपस्थितीत बैठका घेण्याची मागणी केली तसेच स्पष्ट धोरण तयार करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. या पाठपुराव्याची दखल घेत शासनाने अखेर शाळांच्या ५०० मीटर परिसरात अशा ऊर्जा पेयांच्या विक्रीवर बंदीचे निर्देश जारी केले आहेत. यासंदर्भात अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी संबंधित निर्देश दिल्याची माहिती आहे.

या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या संरक्षणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले गेल्याची भावना शिक्षण क्षेत्र, पालक आणि विद्यार्थी वर्गातून व्यक्त होत आहे. दरम्यान, अशा पेयांवर केवळ शाळा परिसरापुरते निर्बंध न ठेवता राज्यभर सर्वसमावेशक धोरण राबविण्याची गरज असल्याचे मतही आमदार तांबे यांनी व्यक्त केले आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे शाळा परिसरात विद्यार्थ्यांना उच्च कॅफिनयुक्त एनर्जी ड्रिंक्स सहज उपलब्ध होण्यास आळा बसणार असून, विद्यार्थ्यांच्या आरोग्य संरक्षणासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मानले जात आहे.

# बसस्थानकातील स्वच्छतागृह बेवारस

## घाणीच्या साम्राज्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय



युवावार्ता (प्रतिनिधी)

राज्य परिवहन महामंडळाने बसस्थानकांवरील स्वच्छतागृहे प्रवाशांसाठी विनामूल्य उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला असला, तरी संगमनेर बसस्थानकात या निर्णयाला हरताळ फासला जात असल्याचे चित्र आहे. स्वच्छतेच्या जबाबदारीत झालेल्या बदलानंतर नवीन ठेकेदाराने अद्याप स्वच्छतागृहाचा ताबा न घेतल्याने गेल्या आठ दिवसांपासून येथील स्वच्छतागृह अक्षरशः बेवारस पडले असून, घाणीचे साम्राज्य आणि असह्य दुर्गंधीमुळे प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

महाराष्ट्र परिवहन विभागाने बसस्थानकातील स्वच्छतागृहाची जबाबदारी पूर्वीच्या ठेकेदाराकडून काढून स्मार्ट सर्व्हिसेस कंपनीकडे सोपविली आहे. मात्र, कंपनीने अद्याप प्रत्यक्ष ताबा घेऊन स्वच्छतेचे काम सुरू केले नसल्याने संपूर्ण व्यवस्था कोलमडली आहे. स्वच्छतागृहात सर्वत्र घाण साचली असून अस्वच्छतेमुळे तेथे दुर्गंधी पसरली आहे. परिणामी, स्वच्छतागृहाचा वापर करताना प्रवाशांना नाक-तोंड दाबून आत जावे लागत आहे.

संगमनेर बसस्थानक हे राज्यातील प्रमुख आणि अत्यंत वर्दळीच्या बसस्थानकांपैकी एक मानले जाते. दररोज हजारो प्रवासी येथून प्रवास करतात. आधुनिक सुविधा असलेल्या या बसस्थानकात यापूर्वी पिण्याच्या पाण्याच्या समस्येने प्रवासी त्रस्त होते, तर आता स्वच्छतागृहाच्या दुरावस्थेमुळे नागरिकांच्या संतापात भर पडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पूर्वीच्या ठेकेदाराने आठ दिवसांपूर्वी स्वच्छतेचे काम बंद केले आहे. (पान ६ वर)

# इन्स्टाग्रामवरील बाल शोषण कंटेंटवर सरकारचा कडक पवित्रा

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

इन्स्टाग्रामवर बाल लैंगिक शोषणाशी संबंधित सामग्रीला (कंटेंट) प्रोत्साहन देणाऱ्या जाहिरातींसंदर्भात केंद्र सरकारने मेटा कंपनीला समन्स बजावण्याचा निर्णय घेतला आहे. माध्यमांनी सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आपल्या मंत्रालयातील अधिकाऱ्यांना यासंदर्भात मेटाकडून उत्तर मागण्याचे निर्देश दिले आहेत. कोणत्याही डिजिटल व्यासपीठावर बाल लैंगिक शोषणाशी संबंधित सामग्रीचा प्रचार किंवा प्रसार होणे हा अत्यंत गंभीर प्रकार असून, यासाठी संबंधित कंपनीचे उत्तरदायित्व निश्चित केले जाईल, असे सरकारने स्पष्ट केले आहे. मेटा कंपनीसंदर्भात केंद्र सरकारने अशा प्रकारची कडक भूमिका घेण्याची ही एका आठवड्यातील दुसरी वेळ आहे. यापूर्वी बुधवारी सरकारने व्हॉट्सॲपवरील प्रस्तावित 'युझरनेम' वैशिष्ट्यासंदर्भात मेटाला नोटीस बजावली होती. या नवीन वैशिष्ट्यामुळे ऑनलाइन फसवणूक, फिशिंग आणि डिजिटल अटक यांसारख्या सायबर गुन्ह्यांना तसेच बनावट ओळखींद्वारे लोकांना फसवण्याच्या घटनांना प्रोत्साहन मिळेल, अशी भीती सरकारने व्यक्त केली आहे. सरकारसोबत चर्चा होईपर्यंत हे वैशिष्ट्य लागू करू नये, असे निर्देश मेटाला देण्यात आले आहेत. दरम्यान, माहिती तंत्रज्ञान कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल कंपनीवर कारवाई का केली जाऊ नये, अशी विचारणाही सरकारने संबंधित नोटिशीत केली आहे. व्हॉट्सॲप हे एक प्रमुख सोशल मीडिया मध्यस्थ असल्याने त्यावर कायद्यांतर्गत सर्व आवश्यक खबरदारी आणि उत्तरदायित्वाचे दायित्व लागू होते. याची आठवण सरकारने करून दिली आहे.

# सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांच्या थकीत रकमा तात्काळ द्या

## अन्यथा शिवसेना (उबाठा) रस्त्यावर उतरेल - अमर कतारी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर नगर परिषदेतील सेवानिवृत्त सफाई कामगार तसेच इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनफरक, निवृत्तीवेतन (पेन्शन), निवृत्ती लाभ, बोनस आणि इतर सर्व थकीत रकमा कोणतीही बेकायदेशीर अट न लावता तात्काळ अदा कराव्यात, अन्यथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पक्षाचे उपजिल्हाप्रमुख अमर कन्हैयालाल कतारी यांनी दिला आहे.

यासंदर्भात कतारी यांनी संगमनेर नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मागील काही वर्षांत नगर परिषदेतील अनेक सफाई कामगार व इतर कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. मात्र, त्यांच्या वेतनफरकासह निवृत्ती लाभ, पेन्शन आणि इतर देयके अद्यापही प्रलंबित असून प्रशासनाकडून याबाबत सातत्याने टाळाटाळ केली जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. निवेदनात असा आरोप करण्यात आला आहे की, काही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सातवी इयत्ता उत्तीर्ण नसल्यास वेतनफरक अथवा निवृत्ती लाभ मिळणार नाही, असे तोंडी सांगितले जात आहे. सफाई कामगार किंवा वर्ग-४ कर्मचाऱ्यांसाठी अशी कोणतीही शैक्षणिक अट लागू नसताना त्यांच्या हक्काच्या रकमा रोखणे अन्यायकारक व बेकायदेशीर असल्याचा दावा कतारी यांनी केला आहे. सुमारे चार दशकांपूर्वी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सफाई कामगार म्हणून सेवेत रुजू झालेल्या महिला व पुरुष कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक पात्रतेचा मुद्दा उपस्थित करून त्यांच्या निवृत्ती लाभांवर गदा आणणे योग्य नसल्याचेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

नगर परिषद प्रशासनाने सर्व पात्र सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतनफरक, निवृत्तीवेतन, बोनस आणि इतर थकीत रकमा तातडीने अदा कराव्यात तसेच अशा प्रकरणांमध्ये कोणत्याही प्रकारच्या बेकायदेशीर अटी लादू नयेत, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.


दरम्यान, या मागण्यांवर तात्काळ सकारात्मक निर्णय न झाल्यास सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही उपजिल्हाप्रमुख अमर कन्हैयालाल कतारी यांनी दिला आहे.









संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# दूध भेसळ थांबवा, अन्यथा...
## एफडीआय आयुक्त तुकाराम मुंढेचा इशारा



मुंबई (वृत्तसंस्था)

दूध आणि दुग्धजन्य पदार्थात होणारी भेसळ रोखण्यासाठी राज्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. ज्याप्रकारे हॉटेल आणि रेस्टॉरंटच्या बाबतीत सूचना देण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणेच आता दूध भेसळीच्या विरोधात कठोर पाऊले उचलली जाणार असल्याची माहिती तुकाराम मुंढे यांनी पत्रकार परिषदेद्वारे दिली.

दूध भेसळीबाबतचे नवे नियम हे दूध उत्पादकापासून ते ग्राहकापर्यंत सर्वांना लागू असतील, असेही मुंढे यांनी स्पष्ट केले. फार्म टू प्लेट या संकल्पेनुसार या साखळीत जे जे लोक सामील आहेत, त्या सर्वांवर मार्गदर्शक सूचना लागू होणार आहेत, असेही ते म्हणाले.दूध उत्पादक, दूध गोळा करणाऱ्यांपासून ते कोल्ड चेनपर्यंत, प्रक्रिया करण्यापासून ते वाहतुकीद्वारे विक्रेत्यांपर्यंत दूध पोहोचवण्याकरिता जे जे लोक कार्यरत आहेत, त्या सर्वांना २०११ सालचे परवान्याचे किंवा नोंदणीचे मानक लागू आहेत. अन्न उत्पादन मानके व अन्न संयोजके याचेही नियम लागू आहेत. त्याचबरोबर दूषके, अवशेष याचेही २०११ चे नियम लागू आहेत. विक्रीवरील प्रतिबंध आणि निर्बंध लागू आहेत. लेबलिंग आणि प्रदर्शन, अन्न सुरक्षा पॅकेजिंग, तसेच जाहिरात आणि दावे याचेही नियम लागू असल्याचे आयुक्ता तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

दूध आणि दुग्धजन्य पदार्थातील भेसळ रोखण्याकरिता २००६, २०११ आणि इतर आठ प्रकारच्या नियमांचे पालन होणे अत्यावश्यक असल्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले.दूध संकलन केंद्र, दूश शीतकरण केंद्र, दुग्ध प्रक्रिया युनिट्स व उत्पादक, पॅकर्स आणि फिलिंग स्टेशन, वितरक, वाहतूकदार, घाऊक विक्रिते, किरकोळ विक्रेते यांना हे नियम लागू असल्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले. यात सुटे दूध विक्रेतेही समाविष्ट असल्याचे त्यांनी म्हटले.

दूध संकलन केंद्र, दूश शीतकरण केंद्र, दुग्ध प्रक्रिया युनिट्स व उत्पादक, पॅकर्स आणि फिलिंग स्टेशन, वितरक, वाहतूकदार, घाऊक विक्रिते, किरकोळ विक्रेते यांना हे नियम लागू असल्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

दुग्धजन्य पदार्थांचे विक्रेते, त्याचे पॅकिंग करणारे यांनाही नियम लागू असणार आहेत. पनीर, खवा, तूप, लोणी, क्रीम, दही, आईस्क्रिम, चीज, दूध पावडर, फ्लोअर मिल आणि इतर दुग्धजन्य पदार्थ आणि त्याचे उत्पादक यांनाही वरील मानके लागू असणार आहेत. या सर्वांनी नियमांचे तंतोतंत पालन करावे. जेणेकरून ग्राहकाच्या थाळीत सुरक्षित आणि दर्जेदार दूध पोहोचेल. त्यात कोणत्याही प्रकारची भेसळ किंवा छेडछाड असणार नाही, अशी भावना तुकाराम मुंढे यांनी व्यक्त केली.

# शासनाच्या योजना गावपातळीपर्यंत पोहोचवत नागरिकांच्या अडचणी सोडवा - जिल्हाधिकारी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत वेळेत पोहोचला पाहिजे. ग्रामस्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गावात जाऊन नागरिकांच्या अडचणी जाणून घेत योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा सक्षम करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव व ढोरेज येथे विकासकामांची पाहणी तसेच आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर, तहसीलदार सचिन डोंगरे, गटविकास अधिकारी राणी फराटे, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, पोलीस निरीक्षक सोनवलकर (बेलवंडी), तालुकास्तरीय अधिकारी, ग्रामस्तरीय कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते. डॉ. आशिया यांनी ग्रामस्तरावरील अधिकाऱ्यांनी नियमित गावभेटी देऊन शासनाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवाव्यात, नागरिकांना शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत यासाठी गावपातळीवरच सेवा उपलब्ध करून द्यावी, असे सांगितले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करून नागरिकांची गैरसोय टाळण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

कोळगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन त्यांनी आरोग्य सुविधांचा आढावा घेतला. आरोग्य केंद्र परिसर स्वच्छ, सुरक्षित व रुग्णाभिमुख ठेवावा तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक सुविधा सक्षम ठेवाव्यात, असे निर्देश त्यांनी दिले. सुरक्षित प्रसूतींचे प्रमाण वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याच्या सूचनाही वैद्यकीय अधिकाऱ्यांना करण्यात आल्या. ग्रामसचिवालय इमारतीच्या बांधकामाची पाहणी करून कामाची गुणवत्ता व प्रगतीचा आढावा घेत त्यांनी शासकीय इमारती निर्धारित वेळेत आणि उच्च दर्जाच्या पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांना शासकीय सेवा सुलभपणे मिळतील, यासाठी योग्य नियोजन करण्याचेही निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. प्रगतशील शेतकरी हेमंत लगड यांच्या पॉलीहाऊसमधील मिरची व डाळिंब बागेची पाहणी करत आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कमी क्षेत्रात अधिक उत्पादन घेणे हे आदर्श उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. फलोत्पादन, पॉलीहाऊस शेती व उच्च मूल्य पिकांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढत असल्याने अधिकाधिक शेतकऱ्यांनी अशा शेती पद्धतींचा अवलंब करावा, असे आवाहन त्यांनी केले.

ढोरेज येथे शिवपानंद रस्ता खुला करण्यासाठी सुरू असलेल्या कामाची पाहणी करून विकासकामे वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे त्यांनी सांगितले. त्यानंतर ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी व मागण्या जाणून घेतल्या. नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नांवर संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले. दौऱ्यादरम्यान अनेक वर्षांनंतर प्रथमच जिल्हाधिकारी थेट गावात आल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. प्रशासन नागरिकांच्या दारी पोहोचविण्यासाठी अशा गावभेटी सातत्याने सुरू राहतील, अशी ग्वाही डॉ. पंकज आशिया यांनी दिली.

# उध्दव ठाकरेंकडून रामरक्षा आंदोलनची हाक



मुंबई (वृत्तसंस्था)

अयोध्या राम मंदिरातील दान चोरी प्रकरणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने (आरएसएस) आपले पहिले निवेदन जारी केले आहे. या घटनेमुळे रामभक्तांच्या भावना दुखावल्या गेल्या असून दोषींना कठोर शिक्षा झाली पाहिजे, असे म्हटले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने सरकार्यवाह दत्तात्रेय होसाबळे यांनी हे निवेदन जारी केले. निवेदनात म्हटले आहे की, पिढ्यानपिढ्यांच्या संघर्षामुळे आणि लाखो रामभक्तांच्या समर्पण, त्याग व भक्तीमुळे रामजन्मभूमीवर बांधलेले हे भव्य मंदिर संपूर्ण हिंदू समाजासाठी आदर, श्रद्धा आणि भक्तीचे केंद्र बनले आहे. पुढे म्हटले आहे की, रामलल्ला मंदिरातील दानपेट्यांमध्ये जमा केलेल्या निधीची चोरी ही दुर्दैवी घटना आहे. यामुळे संपूर्ण समाजाच्या आणि रामभक्तांच्या (आरएसएससह) भावना आणि श्रद्धा दुखावल्या गेल्या आहेत.

दरम्यान, एकदा अटल बिहारी वाजपेयी म्हणाले होते, की 'अब हिंदू मार नहीं खायेगा'. तसंच आज मी म्हणतोय, 'अब हिंदू माफ नहीं करेगा'. जे जे मंदिर लुटतायत त्यांना हिंदू त्यांची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही. त्याची सुरुवात आम्ही येत्या रविवारपासून करतो आहोत. येत्या रविवारी ५ तारखेला दादरला मारुती मंदिरात रामरक्षा आंदोलन करणार आहोत, अशी घोषणा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे. पक्ष वगैरे न बघता, जे जे रामभक्त असतील, जे जे हिंदू आहेत, त्यांनी या आंदोलनासाठी यावे, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी केला. आम्ही जाब विचारण्यासाठी आम्ही तिथे राम रक्षा म्हणू, हनुमान स्तोत्र म्हणू आणि हनुमान चालीसा सुद्धा म्हणू, असे त्यांनी सांगितले. राम मंदिराच्या मागे ज्यांनी ज्यांनी रक्त सांडलं, ज्यांनी ज्यांना तुरुंगवास झाला, त्या सगळ्यांचे कष्ट हे असे आम्ही वाया जाऊ देणार नाही, असेही उद्धव ठाकरे यांनी सांगितलं.

ते म्हणाले की, आज जी काही दरोडेखोरी चाललेली आहे, राजकीय पक्ष फोडले जातायत, आमदार-खासदार चोरले जातायत, खरेदी-विक्री चालू होते, याला ऑपरेशन नाव दिलं जातंय, मग आता हे ऑपरेशन राम मंदिर भाजपवर उलटणार का, हा एक महत्त्वाचा मुद्दा असल्याचे त्यांनी सांगितलं.

# कृषि विद्युत पंप सुरु करायला गेलेल्या शेतकऱ्याचा विहिरीत पडून मृत्यू

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - उंबरी बाळापूर शिवारात शुक्रवारी (दि. ३) पहाटेच्या सुमारास एका वृद्ध शेतकऱ्याचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. दगडू येशू बाम्हणे (वय ६५) असे मृत शेतकऱ्याचे नाव असून, पहाटे अंधारात शेतातील विद्युत मोटार सुरू करण्यासाठी गेले असताना हा दुर्दैवी प्रकार घडला. या घटनेमुळे कृषिपंपांना रात्रीच्या वेळी दिला जाणारा वीजपुरवठा शेतकऱ्यांच्या जीवावर बेतत असल्याची तीव्र भावना परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उंबरी बाळापूर-ओझर शिवेलगत वस्तीवर राहणारे दगडू बाम्हणे हे कृषिपंपाचा वीजपुरवठा रात्री असल्याने शुक्रवारी पहाटे सुमारे ५.३० वाजता शेतातील मोटार सुरू करण्यासाठी घरापासून काही अंतरावरील विहिरीजवळ गेले होते. मात्र, सकाळी ७.३० वाजेपर्यंत ते घरी परत न आल्याने कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला. त्यांच्या सूनबाई शेतात गेल्यानंतर विहिरीजवळ शोध घेत असताना पाण्यावर बाम्हणे यांच्या चपला तरंगताना दिसल्या. हा प्रकार लक्षात येताच त्यांनी तातडीने कुटुंबीय आणि शेजाऱ्यांना बोलावले. स्थानिकांच्या मदतीने विहिरीत शोधमोहीम राबविण्यात आली असता त्यांचा मृतदेह पाण्याच्या तळाशी आढळून आला. पहाटे अंधार असल्याने विहिरीचा अंदाज न आल्याने त्यांचा पाय घसरून ते थेट विहिरीत पडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच आश्वी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट, पोलीस पाटील वैशाली मैड, रामभाऊ भुसाळ, भगवान मैड, सुंदर शिंदे, किरण बाम्हणे, योगेश बाम्हणे, सुरेश बाम्हणे, भारत बाम्हणे, संतोष बाम्हणे यांच्यासह ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांच्या मदतीने मृतदेह विहिरीतून बाहेर काढून उत्तरीय तपासणीसाठी लोणी येथील रुग्णालयात पाठविण्यात आला. या प्रकरणी पुढील तपास आश्वी पोलीस करत आहेत.

दगडू बाम्हणे यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, जावई, सून आणि नातवंडे असा मोठा परिवार असून, त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# हॉटेल रंगीला पंजाबचा परवाना निलंबित

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाल्याने संगमनेर खुर्द येथील 'हॉटेल रंगीला पंजाब' जाब' या हॉटेलचा परवाना जिल्हाधिकाऱ्यांनी ३० दिवसांसाठी निलंबित केला आहे. त्यामुळे हे हॉटेल तातडीने बंद करण्यात आले आहे. संगमनेर खुर्द येथे हॉटेल रंगीला पंजाब सुरू होते. हॉटेल मालकाने नियम व शर्तीचे उल्लंघन केल्याची तक्रार आल्याने राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुय्यम निरीक्षक यांनी चौकशी केली होती. दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी हॉटेल रंगीला पंजाब या हॉटेलचे निरीक्षण केले असता त्यांना त्रुटी आढळून आलेल्या आहेत. यामध्ये नोंदवही अपुर्ण नोंदविली आहे. म्हणजेच दोन दिवसांच्या नोंदी न घेणे, हॉटेल मध्ये काम करणा-या नोकरांचे नोकरनामे सादर न करणे, हॉटेलचे व्यवहार विहित वेळेनंतर पावणे बारा वाजेपर्यंत सुरू ठेवणे, अधिकृत जागेशिवाय बाहेर लॉन्सवर ग्राहकांना पिण्यासाठी मद्यविक्री करणे, विना मद्य परवाना ग्राहकांस मद्यविक्री करणे, हॉटेलचा मंजूर नकाशा सादर न करणे अशा त्रुटी आढळून आल्या.

याबाबत जिल्हाधिकारी यांच्या दालना मध्ये सुनावणी करण्यात आली. हॉटेल मालक यांनी अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाले. सदर नियमभंग प्रकरण हे गंभीर स्वरुपाचे असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी या हॉटेलचे व्यवहार ३० दिवसांसाठी निलंबित करण्याचे आदेश दिले.

# अ‍ॅट्रोसिटीतील दोषसिध्दीचे प्रमाण वाढवा - मुख्यमंत्री



मुंबई (वृत्तसंस्था)

अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अर्थात अ‍ॅट्रॉसिटी' कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान भवन येथे आयोजित अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अंमलबजावणीसाठी गठित राज्यस्तरीय दक्षता व संनियंत्रण समितीच्या बैठकीत दिले. या कायद्यासारख्या विशेष कायद्यामध्ये सरकारी वकिलांमार्फत दोषसिद्धी वाढविण्यासाठी करण्यात आलेल्या कार्याचा उल्लेख त्यांच्या मूल्यमापनात करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

भारतीय न्याय संहितेमध्ये कुठल्याही खटल्यात दोन वेळा तडजोड किंवा समायोजन करण्याची तरतूद असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातही या तरतुदींवर आधारित कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करावा. विशेष कायद्यांमध्ये दोन वेळा समायोजनाचीच तरतूद असावी. जेणेकरून अशा गुन्ह्यांमध्ये आरोपी सुटणार नाहीत. राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये ट्रॉसिटीचे गुन्हे जास्त आहेत, त्या ठिकाणी जलदगती न्यायालय उभारावीत. या न्यायालयांच्या माध्यमातून खटल्यांच्या निकालांना गती मिळेल. त्यामुळे पीडितांना गुन्हा दाखल झाल्यापासून कमी कालावधीत न्याय मिळणार असल्याचा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

गृह विभागाच्या मार्वल संस्थेच्या माध्यमातून ट्रॉसिटी गुन्ह्यांमधील दोषसिद्धी न होण्याची कारणे शोधून गुन्हा दाखल झाल्यापासून ते न्यायालयामध्ये खटला दाखल करेपर्यंत विशिष्ट कार्य पद्धती तयार करण्यात यावी. यामध्ये तकलादू पुरावे, चेन ऑफ इव्हेंट, साक्षीदार फितूर होणे या बाबींचा अभ्यास करून ही विशिष्ट कार्यपद्धती असावी. या कायद्याअंतर्गत दाखल खटल्यांच्या न्यायालयीन सुनावणीची भारतीय न्यायसंहितेमधील तरतुदीनुसार व्हिडिओ चित्रीकरण करावे, जेणेकरून साक्षीदार फितूर होण्याचे प्रमाण कमी होईल.

जिल्हास्तरावर कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करीत सरकारी वकिलांशी संवाद व समन्वय वाढविण्यात यावा. या कायद्याच्या अंमलबजावणीशी संबंधित असलेल्या सर्व यंत्रणांची कार्यशाळा घेऊन त्यांना प्रशिक्षित करावे. तसेच कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आणि पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली वर्षातून सहा महिन्याच्या अंतराने बैठक आयोजित करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

# मृत्यूवर हसणाऱ्यांवर कारवाई करा
## राज ठाकरेंचा फडणवीसांना इशारा



मुंबई (वृत्तसंस्था) सध्या राज्यात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. अनेक ठिकाणी पाणी साचले आहे तर काही ठिकाणी झाडे कोसळून दुर्घटना घडली. पहिल्या दुर्घटनेत एका चिमुकल्याचा मृत्यू झाला. तर दुसऱ्या घटनेत असलम शेख या व्यक्तीचा मॅनहोलमध्ये पडून दुर्दैवी अंत झाला आहे. या दोन्ही घटनांमुळे संताप व्यक्त केला जात आहे. चेंबूर आणि साकीनाका येथे घडलेल्या दोन संवेदनशील घटनेबाबत बोलताना आमदार अमित साटम यांना हसू आले होते. आता यावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली आहे.राज ठाकरे यांनी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी, भारतीय जनता पक्षाच्या केंद्रातील लोकांना सत्तेचा माज आला आहे, हे पूर्व , पश्चिम , उत्तर , दक्षिण भारतातील लोकं सर्रास बोलत आहेत. केंद्रातील लोकं वाट्टेल तसे वागत आहेत याचा राग लोकांच्या मनात होता आणि आहेच. पण हा संसर्ग आता आपल्या राज्यापर्यंत पसरला आहे ? आणि तुम्ही तू पसरू देताय? असा सवाल केला आहे.पुढे ते म्हणाले, देशातील इतर राज्यातील राजकारण आणि महाराष्ट्रातील राजकारण यात जमीन असमानाचा फरक होता. महाराष्ट्रच्या राजकीय नेत्यांच्या विचारांचं आणि उमदेपणाचं एक कौतुक आणि कुतूहल साऱ्या देशात होतं ! पण गेल्या काही वर्षांत आपण आपली बरोबरी उत्तरेकडील काही मागास विचारांच्या राज्यांबरोबर करायला लागलोय हे आता स्पष्टपणे जाणवत आहे! तुमचा एक आमदार आणि पदाधिकरी लोकांच्या मृत्यूवर फिदीफिदी हसतो आणि त्यावर कारवाईचा एकही आसूड ओढला जात नाहीये. एक फार प्रसिद्ध वाक्य आहे जे तुम्ही पण कधी ऐकलं असेल, "Power tends to corrupt, and absolute power corrupts absolutely' पण या वाक्याचा अर्थ उद्या समजून सांगायची वेळ आली तर सध्याचे भारतीय जनता पक्षाचे तुमचे सहकारी हे आदर्श उदाहरण ठरतील अशी परिस्थिती आहे. कोणाला कशाचाच खेद नाही, खंत नाही, अशी परिस्थिती आहे. आणि या सगळ्यात तुम्ही एकही अवाक्षर बोलत नाही यामुळे सगळे बेफाम झाले आहेत.

# कै. प्रकाश सुखदेव थोरात यांच्या प्रथम

## संघर्षातून घडलेले कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व...!!

चणे खावे लोखंडाचे, तेव्हाच ब्रह्मपदी नाचे...

संत तुकारामांच्या अभंगवाणीतील साजेसं व्यक्तिमत्त्व म्हणजे आमचे साहेब - प्रकाशराव थोरात. पै-पाहुण्यांपासून पंचक्रोशीपर्यंत सर्वांच्या परिचयाचे, आदराचे आणि विश्वासाचे नाव म्हणजे प्रकाशराव थोरात साहेब.



प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत, संकटांवर मात करत त्यांनी स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडविले. परिस्थितीच्या मायेच्या सावलीत नव्हे, तर संघर्षाच्या उन्हात ते घडले. वडगाव पानच्या मातीत बालपण आणि किशोरवय व्यतीत करत त्यांनी शिक्षणासाठी अनेक हालअपेष्टा सहन केल्या. शिक्षणासाठी प्रतिकूल परिस्थिती असतानाही त्यांनी कधीही हार मानली नाही. कष्टाला मित्र मानले, अभ्यासाला साधना मानली आणि स्वतःच्या आवडीच्या क्षेत्रात शिक्षण पूर्ण करून जीवन सुगंधित केले. कृषी खात्यात सेवा करत असतानाही ते केवळ नोकरीपुरते मर्यादित राहिले नाहीत. शेतीची आवड जोपासत त्यांनी प्रयोगशील वृत्ती अंगीकारली. आधुनिक शेती, नियोजनबद्ध गुंतवणूक आणि दूरदृष्टी यामुळे त्यांनी आपल्या कुटुंबासाठी भक्कम पाया रचला. नोकरी... शेती... सामाजिक सेवा... आणि नवनवे प्रयोग... असा त्यांचा जीवनप्रवास सतत सुरू राहिला. प्रत्येक दिवस त्यांनी काहीतरी नवीन शिकण्यात आणि इतरांनाही शिकवण्यात घालवला.

कमी खर्चात अधिक उत्पादन आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर त्यांचा नेहमीच भर असे. शेती हा व्यवसाय म्हणून करा, हा त्यांचा ठाम संदेश होता. रूक्ष माळरानही योग्य नियोजन आणि कष्टांच्या बळावर हिरवेगार करता येते, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. त्यांच्या कार्यशैलीमुळे अनेक शेतकऱ्यांना नवी दिशा मिळाली.

काळ मात्र कुणासाठी थांबत नाही... अखेर नियतीपुढे सर्वांनाच नतमस्तक व्हावे लागते. जरी त्यांच्या कर्तृत्वाची उंची गाठणे अशक्य असले, तरी त्यांनी दाखविलेला मार्ग आजही अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. आज त्यांच्या जाण्याला एक वर्ष पूर्ण झाले. देह आपल्यात नसला तरी त्यांचे विचार, संस्कार, कार्य आणि प्रेमळ आठवणी प्रत्येकाच्या मनात आजही जीवंत आहेत.

त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करत एकच प्रार्थना- कालाय तस्मै नमः!

साहेबांची आठवण येत नाही असा दिवस येत नाही. भावपूर्ण श्रद्धांजली! माणूस जातो... पण त्याचे संस्कार अमर राहतात. त्याची कर्तृत्वगाथा काळाच्या ओघातही जिवंत राहते. तुमच्या स्मृती आमच्यासाठी सदैव प्रेरणास्थान राहतील.

कै. प्रकाश सुखदेव थोरात यांना विनम्र अभिवादन!

**- श्री. नंदकुमार तळेकर (पुणे)**



# थोरात कुटुंबाचे आधारवड, कुटुंबवत्सल, मितभाषी व्यक्तिमत्त्व

# आमचे पप्पा कै. प्रकाश सुखदेव थोरात

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो ते प्राशन करेल, तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही, हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार शिक्षणाचे महत्त्व अचूकपणे सांगतात. कोणत्याही देशाचा व समाजाचा विकास हा शिक्षणावर अवलंबून असतो. मात्र, जेव्हा शिक्षणाचा संबंध गरिबीशी जोडला जातो, तेव्हा एक वेगळाच संघर्ष सुरू होतो. गरिबीच्या चिखलात उमललेले कमळ ज्याप्रमाणे स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करते, त्याचप्रमाणे गरिबीतील विद्यार्थी संघर्षाची वाट चालून यशाचे शिखर गाठतात. असे म्हणतात की, शांत समुद्रात कोणीही कुशल खलाशी बनू शकत नाही; तो वादळातच घडतो. गरिबीच्या आगीत तापलेले विद्यार्थी सोन्यासारखे चमकतात. प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांच्यामध्ये जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम करण्याची सवय निर्माण होते. त्यांना जाणीव असते की, शिक्षणाशिवाय त्यांच्या जीवनाचा स्तर सुधारणार नाही. याच जाणिवेतून ते अभ्यासात अधिक लक्ष केंद्रित करतात. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे वडगाव पान, तालुका संगमनेर येथील कै. प्रकाश सुखदेव थोरात हे होय. अत्यंत प्रतिकूल, कष्टमय परिस्थितीत त्यांनी स्वतःचे शिक्षण करून अस्तित्व तयार केले. परंतु नियतीला काही गोष्टी मान्य नसतात आणि दिनांक २५ जुलै २०२५ रोजी हे अमृततुल्य व्यक्तिमत्त्व आपल्यातून निघून गेले. कै. प्रकाश सुखदेव थोरात यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या अलौकिक कार्याचा व संपूर्ण आयुष्याचा घेतलेला हा थोडक्यात मागोवा...

**बालपण**

वडील सुखदेव थोरात व आई पर्वताबाई यांना एकूण ११ अपत्ये झाली. पैकी चार मुलं व सात मुली. मुलींमध्ये भागीरथी वर्पे, कुसुम शेटे, हिरा डोंगरे, चंद्रकला दिघे, ताराबाई कुडेकर, मंदा भवार, सुनंदा काळे या सात मुली, तर आत्माराम थोरात, प्रकाश थोरात, सुरेश थोरात व दत्तात्रय थोरात ही चार मुले. या सर्वांमध्ये कै. प्रकाश यांचा पाचवा क्रमांक. घरची परिस्थिती अत्यंत गरीब. पारंपरिक शेती व शेतीला जोडव्यवसाय म्हणून केला जाणारा पशुपालन, त्यातच वडील संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह करत. कुटुंब मोठे असल्याने सर्व मुलांचे शिक्षण करणे वडिलांना शक्य नव्हते; परंतु सर्व मुलांनी शिकावे, ही त्यांची इच्छा होती. आणि हीच इच्छा कै. प्रकाश यांनी पूर्ण करण्याचे ठरवले.

**शिक्षण**

घरच्या गरीब परिस्थितीमुळे शिक्षणाची उमेद जवळपास नव्हतीच. परंतु जमेल त्या परिस्थितीत कै. प्रकाश थोरात यांनी शिक्षणाला सुरुवात केली. त्यांना कधी पुस्तके मिळत, तर कधी मिळत नसत. शाळेसाठी असलेल्या कपड्यांना ठिगळे लावलेले असत. तेच कपडे धुवायचे व तेच घालायचे, असा त्यांचा नित्यक्रम होता. सर्व विषयांसाठी एकच वही आणि चप्पल तर कधी बघायलाही मिळत नसे. या सर्व परिस्थितीत कसेतरी हायस्कूलचे शिक्षण पूर्ण केले. परंतु शिक्षणाची दृढ इच्छा व मुळातच हुशार असल्याने कै. प्रकाश थोरात हे चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होत गेले. पुढील शिक्षणासाठी लोणी येथे प्रवेश घेतला. जाण्या-येण्यासाठी पैसे नसल्याने बारावीपर्यंतचे शिक्षण सायकलवर प्रवास करून पूर्ण केले. बारावीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढे काय? असा प्रश्न त्यांना पडला. तेव्हा त्यांनी बी.एस्सी. ग्रीसाठी धुळे येथे प्रवेश घेतला व आपले शिक्षण पूर्ण केले.

**नोकरी व संसार**

बी.एस्सी. ग्री पूर्ण झाल्यानंतर त्यांना लगेचच जवळा, निघोज या ठिकाणी कृषी सहाय्यक म्हणून नोकरी मिळाली. पगार कमी असला तरी घरच्यांना मदत व्हावी, ही तगमग त्यांची होती. तीन वर्षांनी कृषी पर्यवेक्षक म्हणून जवळा, पारनेर, बेलवंडी, श्रीगोंदा तालुक्यात रुजू झाले. कृषी सहाय्यक असताना २५ फेब्रुवारी १९८७ रोजी त्यांचा विवाह अकोल्याचे अंबादास नाईकवाडी व सुमन नाईकवाडी यांची मोठी मुलगी संगीता यांच्यासोबत झाला. अकोल्यात वास्तव्य करून त्यांनी आपला संसार फुलविला. त्यादरम्यान त्यांच्या संसारवेलीवर दोन छान फुले जोडली गेली. स्वप्नील व प्रेरणा यांच्यावर संस्कार घडवत, नोकरी प्रगतीपथावर जात त्यांनी आपल्या जीवनाचा आलेख उंचावत ठेवला.

**नोकरीचा प्रवास**

अकोले येथे तब्बल तेरा वर्षे त्यांनी सेवा केली. त्यानंतर त्यांची बढती होऊन बदली राजगुरुनगर येथे झाली. नंतर मंचर, शिरूर, सासवडपर्यंत त्यांच्या नोकरीचा प्रवास विस्तारला. सासवड येथे कृषी अधिकारी म्हणून ते निवृत्त झाले. हा तर त्यांचा नोकरदार स्वभाव; पण त्यांच्यातील उत्कृष्ट व्यावसायिक व दूरदृष्टीचा गुंतवणूकदार त्यांना शांत बसू देत नव्हता. त्यांच्या याच चाणक्यनीतीने त्यांनी संगमनेर व अकोले येथे मुलांच्या भविष्याच्या दृष्टीने काही गुंतवणूक केली.

**असामान्य व्यक्तिमत्त्व**


कै. प्रकाश थोरात यांना ज्यांनी कुणी पाहिले आहे, अनुभवले आहे, त्यांना त्यांचा स्वभाव कधीही विसरता येणार नाही. शांत, संयमी, मितभाषी, करारी विचार, गळ्यामध्ये कायम शबनम लटकावलेली. त्या काळात महिंद्रा डी.आय. घेऊन पत्नीसोबत मनसोक्त फिरणारे, स्वतःचा जीवनप्रवास काटकसरीने करणारे; परंतु कुटुंबाला आनंदी व मनमोकळेपणाने जगू देणारे, स्वप्नील व प्रेरणाला जिवापाड प्रेम करणारे, सर्व बहिणी व भावांना व्यावसायिक, सामाजिक समर्थन करणारे, सून शीतलला मुलीप्रमाणे प्रेम देणारे, नातू समर्थसोबत कायमच खेळकर जीवन जगणारे आजोबा, भाचे-पुतण्यांना नेहमीच मार्गदर्शन करणारे साहेब. सासरी त्यांचा एक वेगळाच रुबाब होता. मेहुणे व साडू यांचे लाडके साहेब. त्यांच्या नजरेची जरब कायम स्मरणात राहील, अशी त्यांची रुबाबदार छबी आज आपल्या सर्वांच्या नजरेआड गेली खरी; पण थोरात साहेब त्यांच्या कार्यकर्तृत्वातून संपूर्ण कुटुंबाच्या कायम स्मरणात राहतील. त्यांनी केलेले कार्य हे कुटुंबवत्सलतेची एक आगळीच ओळख होती. त्यांचा हा प्रवास संपून तब्बल एक वर्ष झाले आहे.

आमचे पप्पा कै. प्रकाश थोरात यांचे प्रथम वर्षश्राद्ध रविवार, दिनांक ५ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता पंकज लॉन्स, समनापूर रोड, तालुका संगमनेर येथे महाराष्ट्र भूषण समाजप्रबोधनकार श्री. निवृत्ती महाराज देशमुख यांच्या सुश्राव्य कीर्तनाने होईल.

आदरणीय पप्पांना त्यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली..!

**- श्री. स्वप्नील प्रकाश थोरात**
**(मुलगा)**
M.B.A. (Businessman)





प्रथम पुण्यस्मरण...
वर्ष सरले...
पण आठवणींचा सुगंध अजूनही दरवळतो,
तुमच्या प्रेमाचा प्रत्येक स्पर्श आजही मनात दाटून येतो.
कष्टांच्या वाटेवरून चालत आयुष्य घडवले तुम्ही,
स्वतः जळून इतरांच्या जीवनात प्रकाश पेरला तुम्ही.
शांत स्वभाव, मितभाषी वाणी, मन मात्र विशाल होते,
संकटांच्या वादळातही तुमचे धैर्य अढळ उभे होते.
नात्यांना जपण्याची तुमची रीतच काही वेगळी होती,
स्वतःचे दुःख लपवून इतरांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणारी होती.
आज घरात सर्व काही आहे...फक्त तुमच्या प्रेमळ हाकांचीच उणीव आहे.
प्रत्येक आनंदाच्या क्षणी तुमची आठवण येते,
डोळ्यांत नकळत अश्रू दाटून येतात.
देह निघून गेला असला,तरी
संस्कार, विचार आणि प्रेम आजही आमच्यासोबत आहे.
तुमच्या आशीर्वादाची सावलीच
आमच्या आयुष्याचा खरा आधार आहे.
तुमच्या पवित्र स्मृतींसमोर आम्ही कृतज्ञतेने मस्तक झुकवतो...
प्रथम पुण्यस्मरणा निमित्त पप्पांना भावपूर्ण विनम्र श्रद्धांजली..!

# पुण्यस्मरण निमित्ताने विनम्र अभिवादन !

## आठवणीतले थोरात साहेब...

उपजला प्राणी जाईल बरवा, मृत्युपंथे
या रामदासांच्या वाणी प्रमाणे या जगात जन्म घेतलेला प्रत्येक माणूस हा मृत्यूमार्गाने जाणार आहे. पण असा जन्म व्हावा देहाचे चंदन व्हावे, या उक्तीला शोभेल असं जीवन थोरात साहेब यांचे होते. प्रकाश नावाप्रमाणेच त्यांनी त्यांच्या सर्व कुटुंबाला प्रगतीपथावर नेवून ठेवले. त्या काळात कुटुंबाची परिस्थिती जोमाचीच. साहेब यांचे आई व वडील कष्ट करत व मेहनतीत जीवन जगणारे. थोरात साहेबांना तीन भाऊ व सात बहिणी - भागीरथी वऱ्हे, कुसुम शेटे, हिरा डोंगरे, चंद्रकला दिघे, ताराबाई कुडेकर, मंदा भवार, सुनंदा काळे व भाऊ आत्माराम थोरात, सुरेश थोरात, दत्तात्रय थोरात. यामध्ये प्रकाश थोरात पाचव्या नंबरचे. घरची परिस्थिती गरीबीची, त्यामुळे त्यांचे शिक्षणही कधी पुस्तके असत तर कधी नसत. सर्व विषयांना एकच वही, कपड्यांना ठिगळ लावलेले, तेच कपडे धुवायचे व तेच घालायचे. चप्पल तर बघायलाही नाही, कसेतरी हायस्कूलचे शिक्षण पूर्ण केले. पण अंगची हुशारी असल्याने पुढील शिक्षण घेण्याचे ठरवले, तेही पैसे नसल्याने सायकलवर जाऊन अॅडमिशन घेतले. नंतर पुढील शिक्षणासाठी बी.एस्सी. अॅग्रीसाठी धुळ्याला अॅडमिशन घेऊन शिक्षण पूर्ण केले व त्यानंतर लगेचच कृषी सहाय्यक म्हणून जवळा (निमोज) येथे रुजू झाले. पगार कमी होता, पण गरजूंना मदत करावी ही तगमग असे. नंतर तीन वर्षांनी कृषी पर्यवेक्षक म्हणून जवळा (पारनेर), बेलवंडी (श्रीगोंदा) तालुक्यात रुजू झाले. कृषी सहाय्यक असताना २५ फेब्रुवारी १९८० रोजी लग्न झाले. अकोल्याच्या अंबादास नाईकवाडी व सुमन नाईकवाडी यांची मोठी मुलगी संगीता हिच्यासोबत विवाह झाला. नंतर अकोल्यात वास्तव्य करून त्यादरम्यान संसारवेलीवर दोन सुंदर फुले उमलली - स्वप्निल व प्रेरणा. त्यांच्यावर संस्कार घडवत, नोकरीत प्रगतीपथावर जात त्यांनी आपल्या जीवनाचा आलेख कायम उंचावत ठेवला. अकोले येथे तेरा वर्षे नोकरी केल्यानंतर राजगुरुनगर येथे बदली झाली, त्यानंतर मंचर, शिरूर, सासवड पर्यंत त्यांचा प्रवास झाला व सासवडमध्ये कृषी अधिकारी म्हणून निवृत्ती घेतली. हा तर त्यांचा नोकरदार स्वभाव झाला, पण त्यांच्यातील उत्कृष्ट व्यावसायिक व दूरदृष्टीच्या गुंतवणूकदाराला शांत बसू देत नव्हता. याच चाणाक्ष वृत्तीने त्यांनी संगमनेर व अकोले येथे जमिनीचे अनेक प्लॉटिंग मोठ्या प्रमाणात वाढवले.

थोरात साहेबांना ज्यांनी कुणी पाहिले व अनुभवले, त्यांच्या मनात त्यांचा एकच चेहरा कायम राहावा असा शांत, संयमी, नेहमी हसतमुख चेहरा, कायम गळ्यात शबनम लटकवलेली. त्या काळात मोटारसायकल घेऊन पत्नीबरोबर मनसोक्त फिरणारे, स्वतःचा जीवनप्रवास काटकसरीने करणारे, परंतु कुटुंबाला आनंदी व मनमोकळेपणाने जगू देणारे. स्वप्निल व प्रेरणावर जिवापाड प्रेम करणारे, सर्व बहिणी व भावांना व्यावसायिक व सामाजिक पाठबळ देणारे, सून शीतलला मुलीसारखेच प्रेम देणारे, नातू समर्थसोबत कायमच खेळकरपणे जीवन जगणारे आजोबा, तसेच भाचे व पुतण्यांना नेहमीच मार्गदर्शन करणारे साहेब. सासरी त्यांचा एक वेगळाच रुबाब होता, सर्व मेहुणे व साडूंचे लाडके साहेब. त्यांच्या नजरेतील जरब कायम स्मरणात राहील अशी त्यांची रुबाबदार छबी आज आपल्या सर्वांच्या नजरेआड गेली, हे खरे. पण थोरात साहेब त्यांच्या कार्यकर्तृत्वातून आम्हा सर्व कुटुंबीयांच्या कायम स्मरणात राहतील. त्यांनी केलेले कार्य ही कुटुंबवत्सलतेची एक आगळी ओळख होती. त्यांचा हा जीवनप्रवास आज दहा दिवसांपूर्वी संपला.

गेल्या दहा दिवसांत साहेब आमच्यात नाहीत, ही जाणीवच कधी आम्हा कुटुंबीयांना झाली नाही. त्यांच्या या अगणित आठवणी अखंड जीवनाची शिदोरी बनून आजही आमच्यासोबत कायम आहेत. ते आज अनंताच्या अविरत प्रवासाला निघून गेले, हे खरे; पण त्यांचे कार्य व त्यांच्या आठवणी विसरणे कधीही शक्य नाही. मी भगवंत पांडुरंगाकडे एवढेच मागणे करेन की, आमच्या साहेबांना वैकुंठात तुझ्या पायाजवळ जागा दे.

कष्टातून संसार फुलविला,
उरली नाही साथ आम्हाला
आठवण येते क्षणा क्षणाला
आजही तुमची वाट पाहतो यावे पुन्हा जन्माला
।। भावपूर्ण श्रद्धांजली ।।

**सोनाली चेतन नाईकवाडी**
मा. नगराध्यक्ष, अकोले नगरपंचायत
अकोले



सर्वांसाठी देह झिजवला ।
कष्टातून आनंद फुलविला ।
उरली नाही साथ आम्हाला ।
आठवण येते तुमची क्षणा क्षणाला ।।

।। श्रीगणेशाय नमः ।। ।। श्रीअगस्ति प्रसन्न ।। ।। श्रीराम समर्थ ।।

मान्यवर महोदय, सप्रेम नमस्कार वि.वि.- आमचे परमपुज्य वडील

### कै.प्रकाश सुखदेव थोरात
यांचे **पुण्यस्मरण** (प्रथम वर्षश्राद्ध)

**नि.जेष्ठ कृष्ण पंचमी, रविवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वा.**
होणार आहे. या निमित्त आयोजित प्रवचनास व प्रसादास आपण सर्वांनी उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

आपले कृपाभिलाशी - **श्रीमती संगिता प्रकाश थोरात**

सौ.शितल व श्री.स्वप्निल प्रकाश थोरात
सौ.मीराबाई व श्री.सुरेश सुखदेव थोरात
सौ.जिजाबाई व श्री.दत्तात्रय सुखदेव थोरात
श्री.अभिजीत सुरेश थोरात

सौ.प्रेरणा व श्री.सुनिल सुरेश पाटील
श्रीमती मंगल आत्माराम थोरात
सौ.पुजा व श्री.उमेश आतमाराम थोरात
श्री.आकाश दत्तात्रय थोरात

**✻ बहिण**
श्रीमती भागीरथी वसंत वर्पे
सौ.कुसुम गंगाधर शेटे
सौ.चंद्रकला मधुकर दिघे
सौ.मंदाबाई जनार्दन भवर
सौ.हिराबाई सूर्यभान डोंगरे
श्रीमती ताराबाई गंगाधर कुडेकर
सौ.सुनंदा विठ्ठल काळे

**✻ मेव्हणे ✻**
आर्की श्री.चेतन आंबादास नाईकवाडी
श्री.बाळासाहेब भिमराज नाईकवाडी
श्री.प्रभाकर धोंडीराम नाईकवाडी

चि.समर्थ स्वप्निल थोरात
कु.सिद्धीका सुनील पाटील

**भाचे ✻**
श्री.शिवाजी सूर्यभान डोंगरे
श्री.निलेश मधुकर दिघे
श्री.गणेश जनार्दन भवर
श्री.भाऊसाहेब गंगाधर शेटे
श्री.अक्षय गंगाधर कुडेकर
श्री.आदेश विठ्ठल काळे

**समस्त थोरात परिवार व आप्तेष्ट वडगाव पान, ता.संगमनेर**

✻ टिप ✻
कोणत्याही प्रकारचा दुखवटा (टॉवेल-टोपी) स्विकारला जाणार नाही.

✻ स्थळ आणि वेळ ✻
**रविवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वा.**
**पंकज लॉन्स् समनापूर रोड, ता.संगमनेर**



महाराष्ट्र भुषण समाज प्रबोधनकार
**ह.भ.प.श्री.निवृत्ती महाराज देशमुख**
**इंदोरीकर यांचे सुश्राव्य किर्तन सेवा होईल**

विजय 9890376810

## मातीशी नाळ जोडलेला अवलिया

कै. प्रकाश सुखदेव थोरात यांचे वडील सुखदेव थोरात, आई पार्वलाबाई थोरात. प्रकाश थोरातांना दहा बहिणी व तीन भाऊ - बहिणी भागीरथी वऱ्हे, कुसुम शेटे, हिरा डोंगरे, चंद्रकला दिघे, ताराबाई कुडेकर, मंदा भवार, सुनंदा काळे, तर भाऊ आत्माराम थोरात, प्रकाश थोरात, सुरेश थोरात, दत्तात्रय थोरात. यामध्ये प्रकाश थोरात पाचव्या नंबरचे. घरची परिस्थिती फारच गरीबीची, वडिलांच्या शेती व्यवसायावरच अवघ्या घराची गुजराण होत असे. त्यामुळे त्यांचे शिक्षणही कधी पुस्तके असत तर कधी नसत. सर्व विषयांना एकच वही, कपड्यांना ठिगळ लावलेले, तेच कपडे धुवायचे व तेच घालायचे, चप्पल तर बघायलाही नाही. कसेतरी हायस्कूलचे शिक्षण पूर्ण केले, पण अंगची हुशारी असल्याने पुढील शिक्षण घेण्याचे ठरवले, तेही पैसे नसल्याने सायकलवर जाऊन अॅडमिशन घेतले. नंतर पुढील शिक्षणासाठी बी.एस्सी. (अॅग्री) साठी धुळ्याला अॅडमिशन घेऊन शिक्षण पूर्ण केले व त्यानंतर लगेचच कृषी सहाय्यक म्हणून जवळा (निमोज) येथे रुजू झाले.

पगार कमी होता, पण घरच्यांना मदत व्हावी हीच तगमग असे. नंतर तीन वर्षांनी कृषी पर्यवेक्षक म्हणून जवळा (पारनेर), बेलवंडी (श्रीगोंदा) तालुक्यात रुजू झाले. कृषी सहाय्यक असताना २५ फेब्रुवारी १९८० रोजी लग्न झाले. अकोल्याच्या नाईकवाडी व सुमन नाईकवाडी यांची मोठी मुलगी संगीता हिच्यासोबत विवाह झाला. नंतर अकोल्यात वास्तव्य करून त्यादरम्यान संसारवेलीवर दोन गोंडस फुले उमलली - स्वप्निल व प्रेरणा. या दोन्ही मुलांवर संस्कार घडवत, नोकरीत प्रगतीपथावर जात त्यांनी आपल्या जीवनाचा आलेख कायम उंचावत ठेवला. स्वाभिमानाने व स्वकष्टाने त्यांनी कुटुंब घडवले. मुलगा स्वप्निल थोरात हे बी.ई. (कॉम्प्युटर) करून आयटीत कार्यरत आहेत, तर त्यांची पत्नी सून शीतल याही उच्चशिक्षित असून घरातील जबाबदाऱ्या समर्थपणे पेलत आहेत.


प्रकाश थोरातांना शेती व झाडांची प्रचंड आवड. त्यांच्याच अकोले व संगमनेरमध्ये मृद्संधारणाची पाणलोट क्षेत्र विकासाच्या माध्यमातून पाणी अडवा, पाणी जिरवा ही योजना राबवली. तालुक्यातील शेतकऱ्यांचा फळबाग लागवडीचा उपक्रम यशस्वी केला. निकडीच्या प्रसंगी पाणी नसतानाही पाणलोट कामांचा विकास करून कारभार केला. यासाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या पिढीचा वारसा सतत जपला. त्यांनी केलेल्या कामांची कार्यवाही आजही काढवाडात त्यांच्या कामाची प्रचिती करून देण्यासाठी ठळकपणे दर्शन देत आहे.

त्यांच्या शेतकरी व ग्राहक हिताच्या कामाची, शेती-मालाच्या ग्राहकापर्यंत विक्री (२००५ ते २००६) या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना राज्यस्तरीय कृषी विभागाकडून महात्मा फुले बाजार हा पुरस्कार विभागीय कृषी सहसंचालक, पुणे यांच्याकडून प्रदान करण्यात आला. तसेच प्रकाश थोरात मित्रपरिवारातही देवाणघेवाणीस तत्पर होते, मित्रांची व नातेवाईकांची आवड होती व वडगावातही त्यांचे मित्रमंडळ मोठे होते. त्यानंतर त्यांची बदली प्रमोशन होऊन मंचरला कृषी अधिकारी म्हणून, मंचर, राजगुरुनगर व सासवड येथे कार्यरत होते. सासवड येथे निवृत्त झाले. रिटायरमेंटनंतर संगमनेर मुक्कामी व नंतर नातवासह अकोले येथे येण्याचे कारण म्हणजे वडगावपासून शेती जवळ राहावी. वडगावातील पिकांचा माल बाजारात नेला व बऱ्याच शेतकऱ्यांना फायद्याचे झाले, ते स्वतः त्यांचे नियोजन करत.

प्रकाश थोरातांना शेतीची, निसर्गाची, झाडांची फार आवड. वडगावपानगल येथे त्यांची शेती आहे, तेथे नियमित बागकाम व स्वतःच्या शेतात काहीतरी लागवड करण्याचा त्यांना छंद होता. शेतातील पाणी अडवण्याच्या दृष्टीने काहीतरी नवीन बांधकाम करून बागायती पिकांचा विस्तार करण्यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असत - साखर कारखाना किंवा इतर कोणत्याही अडचणीवर आवडीने मदत करणे हा त्यांचा स्वभाव होता.

**श्रीमती संगिता प्रकाश थोरात**
**(पत्नी)**





## पप्पा... तुमची उणीव कधीच भरून न निघणारी...

### आमचे पप्पा कै. प्रकाश सुखदेव थोरात यांना भावपूर्ण आदरांजली !







वडील म्हणजे घराची भिंत नसते... ते त्या भिंतीला आधार देणारा पाया असतो. तो पायाच निघून गेला, तर घर आतून कोसळत राहतं... शांतपणे, कोणालाही न दिसता. आज तुमच्या जाण्याला एक वर्ष पूर्ण झाले. कॅलेंडरवर बारा महिने सरले, ऋतू बदलले, दिवस बदलले; पण मन अजूनही त्या दिवसातच अडकून आहे, ज्या दिवशी तुम्ही आम्हाला कायमचं सोडून गेलात. वेळ पुढे सरकत आहे, पण तुमच्या आठवणींचा प्रवास अजूनही आमच्यासोबत चालू आहे. घरात सगळं आहे... पण घरपण नाही. माणसं आहेत... पण त्यांना आधार देणारा हात नाही. प्रत्येक कोपऱ्यात तुमच्या अस्तित्वाची जाणीव आहे, पण तुम्ही दिसत नाही. तुमच्या नसण्याची पोकळी शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे. पप्पा, तुम्ही आमच्यासाठी केवळ वडील नव्हता; तुम्ही आमचं संपूर्ण विश्व होता. आमच्या चेहऱ्यावरचं हसू, आमच्या आयुष्याची सुरक्षितता, आमचा आत्मविश्वास आणि आमचा आधार... हे सगळंच तुम्ही होता.

कृषी खात्यात प्रामाणिकपणे सेवा करताना तुम्ही शेतकऱ्यांच्या सुख-दुःखाशी स्वतःला जोडून घेतलं. शेती तुमच्यासाठी नोकरी नव्हती; ती तुमची ओळख होती. मातीत हात घालताना तुम्ही जणू निसर्गाशी संवाद साधत होता. प्रामाणिकपणा, कष्ट आणि माणुसकी हीच तुमची खरी संपत्ती होती. तुमच्या आयुष्यात संघर्ष खूप होता; पण त्याची झळ तुम्ही आम्हाला कधी लागू दिली नाही. स्वतःच्या इच्छा, स्वप्नं आणि सुख बाजूला ठेवून आमच्या भविष्यासाठी तुम्ही आयुष्यभर झिजलात. आम्हाला अभाव कधी जाणवू दिला नाही. मला प्रेमाने बबड्या म्हणणारा तुमचा आवाज आजही कानात घुमतो. त्या एका शब्दात तुमचं प्रेम, विश्वास आणि माया सामावलेली होती. मुलगी असूनही मला कधी कमी समजलं नाही. उलट मुलाप्रमाणे धैर्य दिलं, स्वाभिमान दिला आणि जगाशी दोन हात करण्याची ताकद दिली.

मी आजारी पडले की तुमचा जीव कासावीस व्हायचा. बरं आहेस का बबड्या? हा प्रश्न आजही आठवला की डोळे पाणावतात. त्या प्रश्नात शब्द नव्हते; फक्त प्रेम होतं. तुमचा स्वभाव म्हणजे माणुसकीचा आरसा होता. कोणाचं वाईट न करणं, संकटात धावून जाणं, कोणालाही रिकाम्या हाताने न पाठवणं-ही तुमची जीवनशैली होती. आज जाणवतं की, हसऱ्या चेहऱ्यामागे किती त्याग दडलेला होता. वडील असताना आयुष्यात भीती वाटत नव्हती. कारण एकच विचार मनात असायचा-पप्पा आहेत ना! आजही अनेकदा एखाद्या कठीण प्रसंगी नकळत तुमचाच विचार मनात येतो.

आज मागे वळून पाहताना जाणवतं... तुम्ही आमच्यासाठी सर्व काही केलं; पण स्वतःसाठी काहीच मागितलं नाही. आमच्या यशातच तुमचं समाधान होतं. आज मनात एकच खंत आहे- तुमची सर्व स्वप्नं पूर्ण होताना तुम्ही पाहू शकलात नाही. तुमच्या जाण्यानंतर घरात शांतता नाही, तर पोकळी निर्माण झाली. तुमची खुर्ची, तुमचे कपडे, तुमचा आवाज, तुमचं हसणं... सगळं आजही तसंच आहे; फक्त तुम्ही नाही. आई आजही धैर्याने जगते; पण तिच्या प्रत्येक श्वासात तुमची आठवण आहे. आम्ही एकमेकांना आधार देतो, पण मनाच्या एका कोपऱ्यात तुमची उणीव कायम आहे. तुमची नात आज मोठी होत आहे. तिला तुमच्याबद्दल सांगताना अभिमान वाटतो आणि मनही भरून येतं. कारण तिला तुमचं प्रेम फार थोडा काळ अनुभवायला मिळालं. आजही सकाळी उठताना, रात्री झोपताना, प्रत्येक आनंदात आणि प्रत्येक दुःखात तुम्ही आमच्यासोबत असल्याची जाणीव होते. तुम्ही शरीराने दूर गेला असलात, तरी तुमचे संस्कार आमच्या प्रत्येक निर्णयात जिवंत आहेत. आज फक्त एवढचं सांगायचं आहे...तुमच्याशिवाय जगणं कठीण आहे, पण तुमच्यासाठी जगणं शिकतोय पप्पा..

पप्पा..
तुम्ही गेलात, पण गेलात नाहीत
तुम्ही दूर आहात, पण दूर नाहीत
तुम्ही दिसत नाहीत, पण प्रत्यक्ष क्षणात आहात
आज तुमच्या प्रथम पुण्यस्मरणाच्या दिवशी फक्त एकच सांगायचे आहे. तुमची जागा कोणीही घेवू शकत नाही.
आणि तुमची उणीव कधीही भरून निघणार नाही.

**असा माझा बाप होता...**

**ज्याचा हात माझ्या डोक्यावर होता, म्हणून मला कधीच कोणाचे पाय धरावे लागले नाहीत. स्वाभिमानाने जगण्याची ताकद, संस्कारांची श्रीमंती आणि संकटांना सामोरे जाण्याचे धैर्य त्यानेच माझ्या आयुष्यात रुजवले. तो आज सोबत नसला, तरी त्याच्या संस्कारांच्या बळावर मी आजही खंबीरपणे उभी आहे... असा माझा बाप होता.**

**ज्याच्या मायेच्या कुशीत मला स्वर्गसुख लाभले, ज्याच्या आशीर्वादाने प्रत्येक वाट सुकर झाली. पण त्याची सेवा करण्याचे भाग्य माझ्या नशिबी फार काळ नव्हते. देवाने माझ्या आयुष्यातील तो आधारवड अकाली हिरावून घेतला... असा माझा बाप होता.**

**स्वतःच्या अंगावर ठिगळांचे कपडे घातले, पण आमच्या आयुष्यात कधी अभाव येऊ दिला नाही. स्वतः उन्हातान्हात राबला, वणवण फिरला, कष्टांची परिसीमा गाठली, पण आमच्या वाट्याला दुःखाची झळही लागू दिली नाही. आमच्या चेहऱ्यावरचे हास्यच त्याचे खरे धन होते... असा माझा बाप होता.**

**त्याने आम्हाला संपत्तीपेक्षा माणुसकीची श्रीमंती दिली. प्रामाणिकपणा, कष्ट, स्वाभिमान आणि प्रेमहीच त्याची खरी ठेव होती. कधी कोणाचे वाईट चिंतले नाही, कधी कोणाचे उणे-दुणे काढले नाही. जो कोणी अडचणीत सापडला, त्याच्या मदतीला तो पहिला धावून गेला... असा माझा बाप होता.**

**आज त्याचे हात डोक्यावर नाहीत, त्याचा आवाज कानावर पडत नाही, पण प्रत्येक निर्णयात त्याची शिकवण आहे, प्रत्येक यशामागे त्याचे आशीर्वाद आहेत, आणि प्रत्येक श्वासात त्याच्या आठवणींचा सुगंध आहे.**

**बाबा... तुम्ही देहाने आमच्यात नसाल, पण आमच्या रक्तात तुमचे संस्कार आहेत, आमच्या विचारांत तुमची शिकवण आहे, आणि आमच्या हृदयात तुमचे स्थान कोणीही कधीच घेऊ शकणार नाही.**

**तुमच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन... भावपूर्ण श्रद्धांजली!**

- तुमची (बबडी) प्रेरणा

**सौ. प्रेरणा सुनिल पाटील**
**(मुलगी)**
B.E. Computer (Working in IT Field)

## संपादकीय...

# शहरांसह ग्रामीण भागातील वाढती सायबर फसवणूक

डिजिटल क्रांतीमुळे भारतात आर्थिक व्यवहार, शिक्षण, आरोग्य, शासनाच्या सेवा आणि दैनंदिन जीवन अधिक सुलभ झाले आहे. स्मार्टफोन, इंटरनेट आणि ऑनलाइन व्यवहारांच्या वाढत्या वापरामुळे शहरांबरोबरच ग्रामीण भागातही डिजिटल सेवांचा विस्तार झाला आहे. मात्र, या प्रगतीसोबत सायबर फसवणुकीचे प्रमाणही चिंताजनकरीत्या वाढत आहे. विशेषतः डिजिटल व्यवहारांची पुरेशी माहिती नसलेल्या नागरिकांना लक्ष्य करून फसवणूक करणाऱ्या टोळ्या नव्या पद्धती वापरत आहेत. त्यामुळे सायबर सुरक्षा हा केवळ तांत्रिक नव्हे, तर सामाजिक आणि आर्थिक चिंतेचाही विषय बनला आहे. पूर्वी सायबर गुन्हे हे प्रामुख्याने शहरांपुरते मर्यादित होते. मात्र, आता ग्रामीण भागात इंटरनेट आणि यूपीआय व्यवहारांचा वापर वाढल्याने तेथील नागरिकही सायबर गुन्हेगारांच्या निशाण्यावर आले आहेत. बँक अधिकारी, पोलीस, सरकारी कर्मचारी किंवा ओळखीच्या व्यक्तीच्या नावाने फोन करून ओटीपी, बँक खात्याची माहिती किंवा यूपीआय पिन मिळवून लाखो रुपयांची फसवणूक केली जात आहे. सोशल मीडियावरील बनावट गुंतवणूक योजना, लॉटरी, नोकरीचे आमिष, कर्ज मंजुरी आणि ऑनलाइन खरेदीच्या नावाखालीही अनेक नागरिक आर्थिक फसवणुकीला बळी पडत आहेत.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर करून सायबर गुन्हेगार अधिक सक्रिय झाले आहेत. बनावट संकेतस्थळे, डीपफेक व्हिडिओ, बनावट क्यूआर कोड आणि फिशिंग लिंकच्या माध्यमातून नागरिकांची वैयक्तिक माहिती चोरली जात आहे. अनेकदा एका चुकीच्या क्लिकमुळे बँक खाते रिकामे होण्याच्या घटना घडत आहेत. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थी हे अशा गुन्हेगारांचे सहज लक्ष्य ठरत आहेत. या वाढत्या धोक्याला रोखण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत. नागरिकांमध्ये सायबर साक्षरता निर्माण करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येकाने बँकेचा ओटीपी, यूपीआय पिन, सीव्हीव्ही क्रमांक किंवा पासवर्ड कोणालाही सांगू नये, अनोळखी लिंकवर क्लिक करू नये आणि कोणतीही आर्थिक माहिती पडताळणीशिवाय शेअर करू नये. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती आणि स्वयंसेवी संस्थांनी सायबर सुरक्षेबाबत नियमित जनजागृती मोहीम राबविणे आवश्यक आहे. सरकारनेही सायबर गुन्ह्यांवर नियंत्रणासाठी विशेष यंत्रणा उभारली असून राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टल आणि हेल्पलाइन १९३० कार्यरत आहेत. मात्र, फसवणूक झाल्यानंतर तातडीने तक्रार नोंदविणे आणि संबंधित पुरावे जतन करणे तितकेच महत्त्वाचे आहे. यासोबतच बँका, दूरसंचार कंपन्या आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म यांनीही संशयास्पद व्यवहारांवर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. डिजिटल भारताच्या यशस्वी वाटचालीसाठी सुरक्षित डिजिटल वातावरण निर्माण करणे अत्यावश्यक आहे. तंत्रज्ञानाचा लाभ घेताना नागरिकांनी सतर्कता, जागरूकता आणि जबाबदारीची भूमिका स्वीकारली, तरच सायबर फसवणुकीवर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल. डिजिटल सुविधा जितक्या वेगाने वाढत आहेत, तितक्याच वेगाने सायबर सुरक्षेची जाणीव प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे ही आजची सर्वात मोठी गरज आहे.

# बसस्थानकातील स्वच्छतागृह बेवारस...

त्यानंतर आगार प्रमुख प्रशांत गुंड यांनी स्मार्ट सर्व्हिसेस कंपनीला दोन वेळा स्मरणपत्र देऊन तातडीने काम सुरू करण्याच्या सूचना दिल्या. मात्र, कंपनीकडून विविध कारणे पुढे करून काम सुरू करण्यास टाळाटाळ केली जात असल्याची माहिती समोर आली आहे.

संगमनेर शहरातील बसस्थानक परिसरात पर्यायी सार्वजनिक स्वच्छतागृहाची सुविधा नसल्याने प्रवासी, व्यापारी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच वाटसरूंना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. विशेषतः महिला आणि लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या कुटुंबांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे.

दररोज हजारो प्रवाशांची वर्दळ असलेल्या या महत्त्वाच्या बसस्थानकातील स्वच्छतेचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, संबंधित कंपनीवर जबाबदारी निश्चित करून आवश्यक कारवाई करावी आणि प्रवाशांना स्वच्छ व सुरक्षित सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांनी केली आह

# कोपरगावात वंचित बहुजन आघाडीला मोठे बळ

## प्रकाश दुशिंग यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश



युवावार्ता (प्रतिनिधी)

कोपरगाव- सन्माननीय बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत कोपरगाव येथील सामाजिक व राजकीय कार्यकर्ते प्रकाश दुशिंग यांनी आपल्या सहकाऱ्यांसह वंचित बहुजन आघाडीत जाहीर प्रवेश केला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशनचे असंख्य कार्यकर्तेही वंचित बहुजन आघाडीत सहभागी झाले.

या पक्षप्रवेशामुळे कोपरगाव तालुक्यात वंचित बहुजन आघाडीची संघटनात्मक ताकद अधिक वाढणार असून आगामी काळात पक्षाचे काम अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचेल, असा विश्वास पक्षाच्या राज्य प्रवक्त्या उत्कर्षा रुपवते यांनी व्यक्त केला. नव्याने पक्षात दाखल झालेल्या सर्व कार्यकर्त्यांचे त्यांनी वंचित बहुजन आघाडी परिवारात स्वागत करत त्यांच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाची चळवळ अधिक व्यापक होईल, असा आशावादही व्यक्त केला.

यावेळी मा. संतोष दादा चोळके, महासचिव मा. मधुकर साळवे, ज्येष्ठ कार्यकर्ते मा. सुनील वाघमारे, मा. संजय भालेराव, डॉ. गौतम चित्ते तसेच वंचित बहुजन आघाडीचे अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पक्षप्रवेश सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# डॉ. नुसरत सय्यद विशेष सेवा पुरस्कार अरविंद गाडेकर यांना प्रदान



युवावार्ता (प्रतिनिधी )

संगमनेर - विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा गौरव, सामाजिक ऐक्याचा संदेश देत जवाहरलाल नेहरू उर्दू सेंटर, संगमनेर आयोजित डॉ. नुसरत पुरस्कार वितरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. जवाहरलाल नेहरू उर्दू सेंटरचे अध्यक्ष इद्रिस शेख यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वी चौदा वर्षांच्या वाटचालीनिमित्त आयोजित या कार्यक्रमाला साहित्य, शिक्षण, सामाजिक, पत्रकारिता आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली. सय्यद आसिफ अली यांची दिवंगत कन्या डॉ.नुसरत सय्यद यांच्या स्मरणार्थ या पुरस्काराचे वितरण झाले.

संगमनेरचे प्रसिद्ध व्यंगचित्रकार, लेखक, कवी आणि संपादक यांना त्यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि व्यंगचित्रकारिता क्षेत्रात केलेल्या भरीव कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. अरविंद गाडेकर हे संगमनेर साहित्यिक मंडळाचे अध्यक्ष, अखिल भारतीय बालकुमार साहित्य संस्थाचे खजिनदार, आधार फाउंडेशनचे सदस्य, अंनिस संगमनेर शाखाचे सचिव आहेत. त्या माध्यमातून ते सामाजिक कामात अग्रेसर आहेत.

डॉ. नुसरत पुरस्कार वितरण सोहळा या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.बाबा खरात, प्रमुख अतिथी किसन भाऊ हासे (संस्थापक संपादक दै.युवावार्ता), प्रमुख पाहुणे हिरालाल पगडाल, ज्ञानेश्वर राक्षे आदी मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना मान्यवरांच्या हस्ते जीवन गौरव, विशेष पुरस्कार, ग्रेट अचिव्हमेंट पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप उदमले यांनी केले, तर बाळकृष्ण महाजन यांनी आभार मानले. या पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून अरविंद गाडेकर यांचे अभिनंदन होत आहे.

# गरिबी आणि संघर्षाची कहाणी सांगणाऱ्या 'भावड्या' चित्रपटाची शूटिंग चनेगाव - पाथरे बु. येथे सुरु




गरिबी, संघर्ष, समाजाचे टोमणे आणि जिद्दीच्या बळावर स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या एका गरीब मुलाची हृदयस्पर्शी कथा मांडणाऱ्या 'भावड्या' या मराठी चित्रपटाचे शुभमुहूर्त आणि शूटिंगचा प्रारंभ पाथरे चनेगाव येथे उत्साहात संपन्न झाला.

'भावड्या' हा चित्रपट एका गरीब मुलाच्या आयुष्याचा संघर्ष मांडणारा असून, गावातील लोकांच्या उपहासाचा आणि हाल-अपेष्टांचा सामना करत तो स्वतःची वाट कशी निर्माण करतो, याची प्रेरणादायी कहाणी या चित्रपटातून उलगडण्यात येणार आहे. गरिबी, सामाजिक विषमता आणि जिद्दीची ताकद यांचे वास्तवदर्शी चित्रण या चित्रपटात करण्यात आले आहे. चित्रपटाचे निर्माते ज्ञानदेव शिंदे व प्रमोद पंडीत यांनी सांगितले की, 'भावड्या' ही केवळ काल्पनिक कथा नसून समाजातील अनेक गरीब कुटुंबांच्या वास्तव आयुष्याचे प्रतिबिंब आहे. हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनाला भिडणारा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या मराठी चित्रपटाची लोकेशन चनेगाव, पाथरे बुद्रुक या परिसरात सुरू आहे,

या चित्रपटात सिद्धी गाडेकर, अबोली बंगाळ, नीता कांबळे, तृप्ती निर्मळ, प्रसन्न जोशी, ज्ञानेश्वर थोटे, ज्ञानदेव शिंदे, अनिल गंगावणे, प्रथमेश केदार, रागिणी चिखलकर, प्रकाश डुकरे आणि भीमा अलोट हे कलाकार भूमिका साकारणार आहेत. चित्रपटाचे छायांकन गणेश तुरकणे, दिग्दर्शक विशाल बर्डे ,करीत आहेत. या चित्रपटाचे मुख्य भूमिकेत अभिनेता व दिग्दर्शक प्रमोद पंडीत म्हणाले की, हा सिनेमा प्रेक्षकांना हसवेल, रडवेल आणि विचार करायला भाग पाडेल. भावना, नाट्य, संघर्ष आणि सिनेमॅटिक थरार यांचा सुंदर संगम या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. चित्रपटातील कथानक, वास्तववादी मांडणी आणि सामाजिक संदेश यामुळे 'भावड्या' हा चित्रपट मराठी सिनेसृष्टीत नवा अध्याय लिहील, असा विश्वास संपूर्ण चित्रपटाच्या टीमने व्यक्त केला असून लवकरच नियमित शूटिंगला सुरुवात होणार आहे.


पाहिजेत
मे. मोहनलाल बन्सीलाल दरडा
कॉम्प्युटर ऑपरेटर (१ जागा)
– पत्ता–
श्रद्धा फर्निचर शेजारी, अकोले रोड, संगमनेर
9822426782

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL


# जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामार्फत विविध पदांची कंत्राटी भरती

अहिल्यानगर- जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहिल्यानगर यांच्या अधिपत्याखालील माजी सैनिकांच्या पाल्यांचे वसतिगृह, कोपरगाव, माजी सैनिक विश्रामगृह, श्रीगोंदा तसेच महासैनिक लॉन येथे विविध पदांवर कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती करण्यात येणार आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी दि. १५ जुलै २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी वि. ल. कोरडे यांनी केले आहे.

या भरतीअंतर्गत सहायक वसतिगृह अधीक्षक, सहायक व्यवस्थापक, चौकीदार, स्वयंपाकी, माळी आणि सफाई कामगार या पदांसाठी नियुक्ती करण्यात येणार आहे. या पदांसाठी नागरी उमेदवारही अर्ज करू शकतात. मात्र, माजी सैनिकांना प्राधान्य दिले जाईल. उमेदवार व्यसनमुक्त असणे आवश्यक असून चौकीदाराचे पद निवासी स्वरूपाचे आहे. इच्छुक माजी सैनिक उमेदवारांनी अर्जासोबत सैन्य सेवेतील डिस्चार्ज बुक, माजी सैनिक ओळखपत्र यांच्या छायांकित प्रती जोडाव्यात. सर्व उमेदवारांनी आधार कार्डाची छायांकित प्रतही अर्जासोबत सादर करावी. उमेदवाराचे वय ४५ वर्षांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. विहित मुदतीत प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.


छोट्या जाहिरातीसाठी संपर्क करा
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०


तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ सेतु/ जन्म नोंद/५५४/२०२६ दिनांक – २४/०६/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. मदन रामराव रा. पिंपरणे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक ०७/०४/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. पिंपरणे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची बहिण नामे मालण रामराव देशमुख यांचा जन्म मौजे पिंपरणे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०१/०७/१९६२ रोजी झाला असून त्यांचा/त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, पिंपरणे यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, कुरकुंडी यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

तहसिलदार संगमनेर


ड्रायव्हार पाहिजे
ऑटोमॅटिक गाडीसाठी 01 जागा
मॅन्युअरल गेअर गाडीसाठी 01 जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
– संपर्क –
9117175050

पाहिजेत
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५९

पाहिजेत
श्रद्धा एजन्सी
ड्रायव्हर - २ जागा
जे. पी. रोड, रंगारगल्ली संगमनेर, जि. अ.नगर
— संपर्क —
9665557877

पाहिजेत
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

भाड्याने देणे
संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत (तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.
संपर्क
9922008706

पाहिजेत
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेल
वेल्डर - 2 जागा
हेल्पर - २ जागा
7030125701
7972963397

भाड्याने देणे आहे
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क -
9822258458









दैनिक युवावार्ता BRAND STORIES

## ब्रँड स्टोरीज - यशस्वी उद्योजकांच्या प्रेरणादायी प्रवासाची कहाणी...

प्रत्येक यशस्वी व्यवसायामागे केवळ भांडवल नसते, तर असते दूरदृष्टी, अथक परिश्रम, संघर्ष, सातत्य, धाडस आणि स्वतःवर असलेला अढळ विश्वास. प्रत्येक उद्योजकाची वाटचाल वेगळी असते. कोणीतरी अगदी छोट्या भांडवलातून सुरुवात करून उद्योगविश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करतो, तर कोणीतरी अनेक अपयशांवर मात करत यशाचे सर्वोच्च शिखर गाठतो. या प्रत्येक प्रवासात असतात असंख्य अनुभव, कठीण प्रसंग, महत्त्वाचे निर्णय, नवकल्पना आणि प्रेरणा देणारे अनेक क्षण. अशाच प्रेरणादायी यशकथांना समाजासमोर आणण्याचा एक छोटासा प्रयत्न म्हणजे ब्रँड स्टोरीज हे दैनिक युवावार्ताचे विशेष सदर. या सदरामधून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या यशस्वी उद्योजकांचा प्रवास, त्यांच्या व्यवसायाची सुरुवात, आलेल्या अडचणी, त्या अडचणींवर केलेली मात, व्यवसाय विस्तारासाठी अवलंबलेल्या संकल्पना, गुणवत्ता, ग्राहकांचा विश्वास, नेतृत्व, व्यवस्थापन आणि त्यांच्या यशामागील विचार जाणून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.



# विश्वास, परंपरा आणि गुणवत्तेचा सुवर्णवारसा सोपान निवृत्ती मैड ज्वेलर्स

SNM JEWELLERS



भारतीय संस्कृतीमध्ये सोन्याला विशेष महत्त्व आहे. सोने हे केवळ एक मौल्यवान धातू नसून ते समृद्धी, परंपरा, सुरक्षित गुंतवणूक आणि भावनिक नात्यांचे प्रतीक मानले जाते. प्रत्येक शुभ कार्यात, सण-उत्सवात आणि आनंदाच्या क्षणी सोन्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे राहिले आहे. अशा या सुवर्णविश्वात अनेक वर्षांपासून ग्राहकांच्या विश्वासाचा दीप प्रज्वलित ठेवणारे नाव म्हणजे सोपान निवृत्ती मैड ज्वेलर्स

सन १९१५ पासून सोनार व्यवसायाची परंपरा जपत आजवर अनेक पिढ्यांचा विश्वास संपादन करणारी ही संस्था गुणवत्तेच्या आणि प्रामाणिकतेच्या बळावर प्रगती करत आहे. सोनार गल्ली, लोणी बुद्रुक, ता. राहाता, जि. अहिल्यानगर येथे सुरू झालेल्या या व्यवसायाने काळानुसार आधुनिकतेची कास धरली, मात्र आपल्या संस्कारांचा आणि परंपरेचा वारसा कायम जपला.आजच्या युगात ग्राहकांच्या आवडीनिवडी झपाट्याने बदलत आहेत. नवीन डिझाईन्स, आधुनिक शैली, पारंपरिक दागिने आणि नाविन्यपूर्ण कलेक्शन यांची मागणी सातत्याने वाढत आहे. या सर्व गरजांचा विचार करून सोपान निवृत्ती मैड ज्वेलर्सने ग्राहकांसाठी आकर्षक आणि उत्कृष्ट दागिन्यांचे विस्तृत कलेक्शन उपलब्ध केले आहे.

या यशामागे संस्थेचे प्रमुख सोपान काका मैड यांचे दूरदर्शी नेतृत्व आणि अथक परिश्रम आहेत. अनेक दशकांपासून त्यांनी व्यवसायात प्रामाणिकपणा, विश्वास आणि ग्राहकसेवा या मूल्यांना सर्वोच्च स्थान दिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा व्यवसाय सातत्याने वाढत गेला आणि अनेक कुटुंबांचा विश्वास संपादन करण्यात यशस्वी झाला. त्याचबरोबर या सुवर्णप्रवासाला आधुनिकतेची जोड देणारे नाव म्हणजे गणेश मैड साहेब. आजच्या डिजिटल युगातील बदलत्या ग्राहक गरजांचा विचार करून त्यांनी व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आहे. आधुनिकतेची सांगड आणि परंपरेचा वारसा यामुळे व्यवसायाला नवीन दिशा मिळाली आहे. सोपान निवृत्ती मैड ज्वेलर्सची सर्वात मोठी ताकद म्हणजे ग्राहकांशी असलेले विश्वासाचे नाते. येथे दागिन्यांच्या शुद्धतेची हमी, योग्य किंमत, पारदर्शक व्यवहार आणि उत्कृष्ट सेवा यांना प्राधान्य दिले जाते. ग्राहकांच्या समाधानाला प्रथम स्थान दिल्यामुळे अनेक कुटुंबे पिढ्यानपिढ्या या संस्थेशी जोडलेली आहेत. भारतीय संस्कृतीत गुरुपुष्यामृत योग यासारख्या शुभ मुहूर्ताला विशेष महत्त्व आहे. या दिवशी केलेली सुवर्ण खरेदी शुभ आणि समृद्धीचे प्रतीक मानली जाते. त्यामुळे अशा विशेष प्रसंगी ग्राहकांसाठी आकर्षक योजना आणि विशेष सुविधा उपलब्ध करून देणे हे देखील या संस्थेचे वैशिष्ट्य ठरले आहे.

आजच्या स्पर्धेच्या युगात व्यवसायात यशस्वी होण्यासाठी फक्त उत्पादने विकणे पुरेसे नसते; ग्राहकांशी मजबूत नाते निर्माण करणे अधिक महत्त्वाचे असते. हे तत्त्व सोपान काका मैड आणि गणेश मैड साहेब यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे. त्यांची मेहनत, दूरदृष्टी आणि ग्राहकांविषयीची बांधिलकी यामुळे आज सोपान निवृत्ती मैड ज्वेलर्स हे नाव विश्वासाचे प्रतीक बनले आहे. सोने म्हणजे केवळ दागिने नाहीत, तर ते विश्वास, परंपरा आणि भावनांचा अमूल्य ठेवा आहे. त्या विश्वासाला अधिक मजबूत करण्याचे आणि ग्राहकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलवण्याचे कार्य सोपान निवृत्ती मैड ज्वेलर्स आजही यशस्वीपणे करत आहे.

**सोपान निवृत्ती मैड ज्वेलर्स**
—— सोनेरी वारसा १९१५ पासून ——
सोनार लेन, लोणी बु||, ता. राहाता,
मोबाईल - ९४०३५४३२३३, (०२४२२) २७३४३६

# मा. अमोल गुंजाळ : यशस्वी उद्योजकतेचा प्रेरणादायी प्रवास





1. हिवाळी अधिवेशन- नागपूर जलसंपदा मंत्री- श्री गिरीश जी महाजन व श्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे शासकीय निवासस्थानी भोजन व्यवस्था पुरवली
2. महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग आयोजित राज्यस्तरीय पंचम क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२६, गोदावरी मराठवाडा चे इवेंट मॅनेजमेंट शिर्डी व लोणी यशस्वीरीत्या केले

THE Royal EVENTS FOOD • DECOR • ENTERTAINMENT

आजच्या स्पर्धात्मक युगात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणे हे मोठे आव्हान असते. मेहनत, जिद्द, दूरदृष्टी आणि ग्राहकांप्रती असलेली निष्ठा या गुणांच्या बळावर अनेक व्यक्ती यशाचे शिखर गाठतात. अशाच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांपैकी एक नाव म्हणजे मा. अमोल गुंजाळ त्यांनी आपल्या उद्योजकीय कौशल्याच्या जोरावर इव्हेंट मॅनेजमेंट आणि केटरिंग क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

मा. अमोल गुंजाळ यांनी आपल्या व्यवसायाच्या सुरुवातीपासूनच गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य दिले. प्रत्येक कार्यक्रम हा ग्राहकांसाठी अविस्मरणीय अनुभव ठरावा, या उद्देशाने त्यांनी आपल्या कामाची सुरुवात केली. लग्न समारंभ, साखरपुडा, वाढदिवस, रिसेप्शन, धार्मिक कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी उत्तम व्यवस्थापन कौशल्य दाखवले आहे. त्यांच्या द रॉयल इव्हेंट्स या संस्थेमुळे अनेक कुटुंबांच्या आनंदी क्षणांना अधिक सुंदर रूप मिळाले आहे. उद्योजक होणे म्हणजे फक्त व्यवसाय उभारणे नव्हे, तर लोकांचा विश्वास संपादन करणेही महत्त्वाचे असते. अमोल गुंजाळ यांनी ग्राहकांच्या अपेक्षा समजून घेत त्यांना सर्वोत्तम सेवा देण्याचा प्रयत्न केला. केटरिंग, डेकोरेशन, लाईटिंग, साउंड सिस्टीम आणि संपूर्ण इव्हेंट व्यवस्थापन या सर्व गोष्टींचे एकत्रित नियोजन करून त्यांनी स्वतःचा स्वतंत्र ठसा उमटवला आहे.

त्यांच्या व्यवसायातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिस्त आणि गुणवत्तेची बांधिलकी. कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते, प्रत्येक कामात पूर्ण समर्पण आणि प्रामाणिकपणा असावा, हे त्यांचे तत्त्व आहे. त्यामुळे त्यांच्या कामाची प्रशंसा अनेक ग्राहकांकडून होत असते. मा. अमोल गुंजाळ यांनी फक्त स्वतःचे यश मिळवले नाही, तर अनेक युवकांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध करून दिल्या आहेत. समाजात रोजगार निर्माण करणे आणि इतरांना प्रगतीची संधी देणे हे देखील एका यशस्वी उद्योजकाचे मोठे कर्तव्य असते. त्यांनी आपल्या उद्योगाच्या माध्यमातून अनेकांना कामाची संधी दिली आणि त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला.

आज अमोल गुंजाळ हे अनेक तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत. त्यांच्या कार्यातून हे स्पष्ट होते की, जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर कोणतीही व्यक्ती मोठे यश मिळवू शकते. त्यांचा प्रवास हा केवळ व्यवसायातील यशाचा नसून समाजासाठी प्रेरणा देणारा आहे. भविष्यातही ते आपल्या कार्यातून अधिक उंच भरारी घेतील आणि समाजात एक आदर्श उद्योजक म्हणून आपली ओळख अधिक दृढ करतील, यात शंका नाही.

# आकाश (पप्पू अण्णा) गोडगे : सामाजिक कार्यासाठी समर्पित 'भीम योद्धा'







समाजात काही व्यक्ती अशा असतात ज्या स्वतःच्या स्वार्थासाठी नव्हे तर समाजाच्या हितासाठी कार्य करत असतात. आपल्या कार्यातून समाजातील वंचित, दुर्बल आणि अन्यायग्रस्त लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने संघर्ष करणारी माणसे समाजाची खरी ताकद असतात. अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक नाव म्हणजे आकाश गोडगे. सामाजिक कार्याला स्वतःला पूर्णपणे समर्पित करून समाजातील अन्यायाविरोधात आवाज उठवणारे आणि लोकांसाठी सदैव तत्पर असलेले एक युवा कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. विशेषतः महाराष्ट्रात दलित समाजावर कुठे अन्याय, अत्याचार किंवा अन्यायकारक घटना घडल्यास ते तात्काळ त्या ठिकाणी पोहोचून पीडितांच्या पाठीशी उभे राहतात. समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी ते नेहमीच संघर्ष करत असतात. त्यांच्या या कार्यामुळे अनेकांना आधार आणि आत्मविश्वास मिळाला आहे. संगमनेर शहरात आकाश गोडगे यांना भीम योद्धा म्हणून ओळखले जाते. ही ओळख त्यांना सहज मिळालेली नाही, तर सामाजिक बांधिलकी, निस्वार्थ सेवा आणि समाजासाठी केलेल्या कार्यामुळे त्यांनी ती मिळवली आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या समानता, न्याय आणि बंधुभावाच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या कार्यात दिसून येतो. ते समाजातील प्रत्येक घटकाला समान हक्क मिळावेत आणि कोणावरही अन्याय होऊ नये यासाठी प्रयत्नशील असतात. त्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ एका समाजापुरता मर्यादित नाही, तर सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचलेला आहे. संकटाच्या काळात मदतीचा हात देणे, सामाजिक प्रश्नांवर जागृती निर्माण करणे आणि युवकांना सकारात्मक दिशादर्शन करणे यामध्ये त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. आकाश गोडगे यांचा प्रवास हा समाजासाठी झटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी प्रेरणादायी आहे. समाजातील बदलासाठी केवळ विचार मांडणे पुरेसे नसते, तर त्यासाठी कृतीही करावी लागते हे त्यांनी सिद्ध केले आहे. त्यांचे कार्य हे समाजातील अनेक युवकांना प्रेरणा देणारे असून भविष्यातही ते अशाच प्रकारे समाजसेवेच्या माध्यमातून आपले योगदान देत राहतील, हीच अपेक्षा.

# कृषीक्षेत्रातील नवोन्मेषी उद्योजक : विवेक रोहोकले यांचा प्रेरणादायी प्रवास

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर हे शहर व्यापार, उद्योग आणि कृषी क्षेत्रासाठी राज्यभर ओळखले जाते. या भूमीत अनेक उद्योजकांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. त्यापैकी एक नाव म्हणजे विवेक रोहोकले.

महात्मा फुले कृषी विद्यापीठातून सूक्ष्मजीवशास्त्र (Microbiology) विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेले विवेक रोहोकले आणि त्यांच्या पत्नी डॉ. सविता रोहोकले यांनी कृषी क्षेत्रात जैविक खते, सेंद्रिय उत्पादने, नीम आधारित कीटकनाशके आणि पर्यावरणपूरक शेती उपाययोजनांच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी उभारलेली विजया ॲग्रो इंडस्ट्रीज ही संस्था आज केवळ उद्योग म्हणून नव्हे, तर शेतकऱ्यांच्या विश्वासाचे प्रतीक म्हणून ओळखली जाते. शाश्वत शेती, मातीचे आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि शेतकऱ्यांचे सक्षमीकरण या संकल्पनांना उद्योगाच्या माध्यमातून प्रत्यक्ष रूप देण्याचे कार्य विवेक रोहोकले यांनी सातत्याने केले आहे. संगमनेर औद्योगिक वसाहतीतून सुरू झालेला हा प्रवास आज देशातील अनेक राज्यांपर्यंत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेपर्यंत पोहोचला आहे.

### सुरुवातीचा प्रवास

प्रत्येक यशस्वी उद्योगामागे दूरदृष्टी, कठोर परिश्रम, संशोधनाची वृत्ती आणि सातत्यपूर्ण प्रयत्न दडलेले असतात. कृषीप्रधान भारतात रासायनिक खतांच्या वाढत्या वापरामुळे जमिनीची सुपीकता कमी होत असल्याचे वास्तव विवेक रोहोकले यांनी जवळून अनुभवले. या समस्येवर शाश्वत उपाय म्हणून जैविक आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्याचा त्यांनी निर्धार केला. याच विचारातून सन २००७ मध्ये विजया ॲग्रो इंडस्ट्रीजची स्थापना झाली. सुरुवातीला अत्यंत मर्यादित उत्पादनांपासून सुरू झालेल्या या उद्योगाने गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य, संशोधनाधारित उत्पादन निर्मिती आणि शेतकऱ्यांशी थेट संवाद या त्रिसूत्रीच्या बळावर अल्पावधीतच स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

### विजया ॲग्रो इंडस्ट्रीजची वाटचाल

संगमनेर औद्योगिक वसाहतीतील आधुनिक उत्पादन केंद्रातून आज विजया ॲग्रो इंडस्ट्रीज विविध प्रकारची जैविक आणि सेंद्रिय कृषी उत्पादने तयार करते. शेतकऱ्यांच्या गरजा, बदलते हवामान आणि आधुनिक शेतीच्या आवश्यकतांचा अभ्यास करून कंपनीने संशोधनाधारित उत्पादनांची विस्तृत श्रेणी विकसित केली आहे. आज कंपनीच्या उत्पादनांमध्ये खालील प्रमुख घटकांचा समावेश आहे-

- सेंद्रिय खते
- जीवाणू खते
- जैविक संप्रेरके
- चिकट सापळे व कामगंध सापळे
- हर्बल कीटकनाशके
- जैविक कीटकनाशके
- जैविक बुरशीनाशके
- जैविक सूत्रकृमीनाशके
- नीम आधारित उत्पादने
- करंज तेल
- सेंद्रिय मृदा सुधारके

कंपनीची सर्व उत्पादने ISO 9001:2015, CIB Registered, NOCA Certified आणि FCO मान्यताप्राप्त आहेत. ही उत्पादने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करण्यास, जमिनीची सुपीकता टिकविण्यास आणि दीर्घकालीन शाश्वत शेतीसाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.







### गुणवत्ताच हे ब्रीद

विजया ॲग्रो इंडस्ट्रीजने सुरुवातीपासूनच गुणवत्ता नियंत्रणाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. कंपनीकडे अत्याधुनिक उत्पादन यंत्रणा, सुसज्ज प्रयोगशाळा, स्वतंत्र संशोधन विभाग, दर्जा तपासणी सुविधा, आधुनिक पॅकेजिंग प्रणाली आणि प्रशस्त वेअरहाऊस उपलब्ध आहे. प्रत्येक उत्पादनाची गुणवत्ता काटेकोरपणे तपासल्यानंतरच ते बाजारात उपलब्ध केले जाते. त्यामुळे शेतकरी आणि वितरकांमध्ये कंपनीबद्दल दृढ विश्वास निर्माण झाला आहे.

शेतकऱ्यांचा विश्वास - यशाची खरी ताकद

विजया ॲग्रो इंडस्ट्रीजच्या यशामागे शेतकऱ्यांचा हा दृढ विश्वास हीच सर्वात मोठी जमेची बाजू आहे. विवेक रोहोकले यांचा विश्वास आहे की, शेतकरी समृद्ध झाला तरच देश समृद्ध होईल. याच विचारातून त्यांनी केवळ उत्पादने विकण्यापुरते स्वतःला मर्यादित ठेवले नाही, तर शेतकऱ्यांचे मार्गदर्शक, सल्लागार आणि विश्वासू सहकारी म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. शेतकऱ्यांना पीक व्यवस्थापन, माती परीक्षण, जैविक शेती, सेंद्रिय उत्पादनांचा योग्य वापर, कीड व रोग व्यवस्थापन, उत्पादनवाढ आणि जमिनीचे आरोग्य यासंदर्भात सातत्याने मार्गदर्शन केले जाते. या प्रयत्नांमुळे अनेक शेतकरी रासायनिक शेतीकडून जैविक शेतीकडे वळले असून उत्पादन खर्चात बचत आणि उत्पादनाच्या गुणवत्तेत वाढ झाल्याचा सकारात्मक अनुभव त्यांनी घेतला आहे. कंपनी राज्यभर आयोजित होणाऱ्या कृषी प्रदर्शनांमध्ये, शेतकरी मेळाव्यांमध्ये, कृषी प्रशिक्षण शिबिरांमध्ये आणि विविध जनजागृती उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविते. या माध्यमातून नवीन तंत्रज्ञान, संशोधन आणि आधुनिक कृषी उपाययोजना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचत आहेत.

### पर्यावरणपूरक शेतीचा पुरस्कार

आज संपूर्ण जग पर्यावरण संवर्धनाचा विचार करत आहे. हवामानातील बदल, जमिनीची घटणारी सुपीकता, भूजल प्रदूषण आणि रासायनिक शेतीचे दुष्परिणाम लक्षात घेता जैविक शेतीची गरज दिवसेंदिवस अधिक अधोरेखित होत आहे. विजया ॲग्रो इंडस्ट्रीजने सुरुवातीपासूनच पर्यावरणपूरक शेतीचा पुरस्कार केला आहे. कंपनीची अनेक उत्पादने नीम, करंज आणि इतर नैसर्गिक घटकांवर आधारित असून ती जमिनीची सुपीकता वाढविण्यास, उपयुक्त सूक्ष्मजीवांचे संरक्षण करण्यास आणि रासायनिक अवशेष कमी करण्यास मदत करतात. यामुळे केवळ पीक उत्पादनात सुधारणा होत नाही, तर जमिनीचे दीर्घकालीन आरोग्य जपले जाते, पाण्याचे प्रदूषण कमी होते आणि पर्यावरणीय संतुलन राखण्यासही हातभार लागतो.

### संशोधन आणि नवकल्पनांना प्राधान्य

विवेक रोहोकले यांनी उद्योगाच्या सुरुवातीपासून संशोधनाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. कंपनीमध्ये संशोधन व गुणवत्ता नियंत्रणासाठी स्वतंत्र विभाग कार्यरत असून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सातत्याने नवीन उत्पादने विकसित करण्यावर भर दिला जातो. शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष अनुभवांचा अभ्यास करून त्यानुसार उत्पादनांमध्ये आवश्यक सुधारणा करणे, अधिक परिणामकारक उपाय विकसित करणे आणि गुणवत्तेची सातत्याने उंचावणारी पातळी राखणे ही कंपनीची कार्यपद्धती आहे.

### रोजगारनिर्मितीत मोलाचे योगदान

विजया ॲग्रो इंडस्ट्रीजने उद्योगवाढीसोबतच स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. उत्पादन, गुणवत्ता नियंत्रण, संशोधन, विपणन, पॅकेजिंग, विक्री, प्रशासन आणि ग्राहक सेवा अशा विविध विभागांमध्ये शंभरहून अधिक कर्मचारी कार्यरत असल्याची माहिती उपलब्ध आहे. ग्रामीण भागातील युवकांना रोजगार उपलब्ध करून देतानाच त्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची ओळख करून देणे आणि कौशल्यविकासासाठी प्रोत्साहन देणे हेही कंपनीचे महत्त्वाचे योगदान आहे.

### राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेकडे यशस्वी वाटचाल

गुणवत्तेच्या बळावर विजया ॲग्रो इंडस्ट्रीजची उत्पादने आज महाराष्ट्रापुरती मर्यादित राहिलेली नाहीत. देशातील विविध राज्यांमध्ये कंपनीचे विस्तृत वितरण जाळे निर्माण झाले आहे. यासोबतच कंपनीने निर्यात क्षेत्रातही उल्लेखनीय प्रगती साधली असून भारतीय कृषी उत्पादनांची गुणवत्ता जागतिक स्तरावर पोहोचविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

### नेतृत्वाची वेगळी ओळख

एखादा उद्योग मोठा होण्यासाठी केवळ भांडवल किंवा अत्याधुनिक तंत्रज्ञान पुरेसे नसते. त्यासाठी दूरदृष्टी, निर्णयक्षमता, संशोधनाची आवड, गुणवत्तेची बांधिलकी आणि समाजाप्रती उत्तरदायित्व असलेले नेतृत्व आवश्यक असते. विवेक रोहोकले यांनी आपल्या कार्यातून ही सर्व वैशिष्ट्ये सिद्ध करून दाखविली आहेत. त्यांच्या नेतृत्वाची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत-

- दूरदृष्टीपूर्ण नियोजन, शेतकरीहिताला सर्वोच्च प्राधान्य
- गुणवत्तेप्रती अखंड बांधिलकी, संशोधन आणि नावीन्याचा सातत्याने आग्रह
- आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, पर्यावरण संवर्धनाची जाणीव
- सामाजिक उत्तरदायित्वाची भावना, रोजगारनिर्मितीची बांधिलकी
- ग्राहकांचा विश्वास जपण्याची कार्यसंस्कृती, याच गुणांच्या बळावर त्यांनी उद्योगविश्वात स्वतःची स्वतंत्र आणि विश्वासार्ह ओळख निर्माण केली आहे.

### भविष्याचा वेध

मातीचे आरोग्य हेच आमचे प्राधान्य या संकल्पनेवर आधारित कार्य अधिक व्यापक करण्याचा कंपनीचा मानस आहे. भविष्यात रासायनिक शेतीवरील अवलंबित्व कमी करून जैविक आणि पर्यावरणपूरक शेतीला अधिक बळ देण्याच्या दिशेने कंपनी सातत्याने कार्यरत आहे. कीड व रोग नियंत्रणासाठी जैविक उपाययोजना अधिक प्रभावी बनविणे, शेतकऱ्यांना सुरक्षित आणि परिणामकारक उत्पादने उपलब्ध करून देणे तसेच विषमुक्त अन्न उत्पादनाला चालना देणे, हे कंपनीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. याशिवाय प्रत्येक ५० शेतकऱ्यांमागे एक कृषितज्ज्ञ व सल्लागार उपलब्ध करून देण्याचा अभिनव उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पीक लागवडीपासून ते काढणी, साठवणूक आणि विक्रीपर्यंत शेतकऱ्यांना तज्ज्ञ मार्गदर्शन देऊन त्यांचे उत्पादन आणि उत्पन्न वाढविण्याचा कंपनीचा मानस आहे. आधुनिक प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अत्याधुनिक कृषी तंत्रज्ञान, जैविक शेती आणि उत्पादन व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्याचेही नियोजन आहे. तसेच चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर तज्ज्ञांच्या साहाय्याने मार्गदर्शन आणि उपाययोजना उपलब्ध करून देण्याचा संकल्प कंपनीने केला आहे. जैविक कृषी उत्पादनांच्या क्षेत्रात भारतीय कंपनीला जागतिक स्तरावर अग्रस्थान मिळवून देण्याचे मोठे स्वप्नही कंपनीने पाहिले असून, आगामी दहा वर्षांत या दिशेने महत्त्वपूर्ण यश मिळविण्याचा त्यांचा निर्धार आहे.

ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५० संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



भंडारी
विवाह
“शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी”
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेझर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# खोटे सर्टिफिकेट दाखवून चालणार नाही

## थेट लायसन्स रद्द होणार - एफडीआयचा निर्णय

मुंबई (वृत्तसंस्था)

अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदाची धुरा स्वीकारल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी भेसळखोरांविरोधात सुरू केलेली मोहीम आणखी तीव्र केली आहे. आता नियमांचे केवळ कागदोपत्री पालन करणाऱ्या हॉटेल, रेस्टॉरंट आणि खाद्य व्यावसायिकांनाही त्यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे. खोटे पेस्ट कंट्रोलचे सर्टिफिकेट दाखवून फसवणूक करणाऱ्यांचे थेट लायसन्स रद्द केले जाईल. एवढेच नव्हे, तर त्यांच्यावर फौजदारी गुन्हेही दाखल करण्यात येतील, असे मुंढे यांनी स्पष्ट केले.

मुंढे म्हणाले की, अनेक आस्थापनांनी पेस्ट कंट्रोल केल्याचे प्रमाणपत्र दाखवले; मात्र प्रत्यक्ष पाहणीत पेस्ट कंट्रोलच करण्यात आले नसल्याचे आढळले. अशा प्रकरणांमध्ये केवळ निलंबन नव्हे, तर नोंदणी कायमस्वरूपी रद्द करण्याची कारवाई सुरू करण्यात आली.

दरम्यान, राज्य शासनाने दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या संपूर्ण पुरवठा साखळीत अन्न सुरक्षा व गुणवत्ता मानकांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यव्यापी सर्वंकष अनुपालन आदेश जारी केला आहे. दूध संकलन, शीतकरण, प्रक्रिया, पॅकेजिंग, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्री या प्रत्येक टप्प्यावर हा आदेश लागू राहणार आहे. या निर्णयाचा उद्देश केवळ भेसळ रोखणे नसून नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण, प्रामाणिक व्यावसायिकांना प्रोत्साहन आणि राज्यात आधुनिक अन्न सुरक्षा संस्कृती विकसित करणे हा आहे.

पेस्ट कंट्रोलसंदर्भात त्यांनी स्पष्ट केले की, प्रत्येक हॉटेल, रेस्टॉरंट, डेअरी किंवा खाद्य आस्थापनाने शासनाकडे नोंदणीकृत एजन्सीकडूनच नियमित पेस्ट कंट्रोल करून घ्यावा. संबंधित एजन्सीसोबत वैध करार असणे बंधनकारक असून कोणत्याही प्रकारचे बनावट किंवा कालबाह्य प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही. उंदीर, कीटक किंवा माशी आढळल्यास कोणतीही सबब ऐकून घेतली जाणार नाही. नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्यांवर शून्य सहनशीलतेचे धोरण राबविले जाईल, असा स्पष्ट इशारा मुंढे यांनी दिला. त्यांनी व्यावसायिकांना आवाहन करताना सांगितले की, नियम नागरिकांना धमकावण्यासाठी नाहीत, तर त्यांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी आहेत. अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसून फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

# घुलेवाडीत बिबट्याचा थरार

## दुचाकीस्वार दोन युवकांवर प्राणघातक हल्ला

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील शहरालगतच्या घुलेवाडी शिवारात मालुंजकर चौफुली ते कानिफनाथ मंदिर या रस्त्यावर बिबट्याने दोन युवकांवर अचानक झडप घालत प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात दोन्ही युवक जखमी झाले असून त्यांच्यावर घुलेवाडी येथील शासकीय दवाखान्यात उपचार सुरू आहेत.

घुलेवाडी ते समनापूर मार्गालगत मोठ्या प्रमाणावर ऊसाची शेती असल्याने या भागात बिबट्यांचे वास्तव्य वाढले आहे. त्याचबरोबर या परिसरात मानवी वस्तीही मोठ्या प्रमाणावर असून या रस्त्यावरून दररोज शेकडो नागरिक दुचाकीने प्रवास करतात. अशा परिस्थितीत बिबटे अचानक दुचाकीस्वारांवर झेप घेत असल्याच्या घटना वारंवार घडत आहेत.

यापूर्वीही या परिसरात बिबट्यांच्या हल्ल्यात अनेक जण गंभीर जखमी झाले असून काहींना जीवही गमवावा लागला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सायंकाळनंतर या मार्गावरून प्रवास करताना नागरिक धास्तावलेले दिसत आहेत.

या पार्श्वभूमीवर वनविभागाने तातडीने बिबट्यांचा बंदोबस्त करावा, पिंजरे लावून त्यांचा बंदोबस्त करावा, गस्त वाढवावी तसेच लोकप्रतिनिधींनीही या गंभीर प्रश्नाची दखल घेऊन कायमस्वरूपी प्रभावी उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

# पिंपळगावखांड धरण ओव्हरफ्लो

## मुळा पाणलोटात संततधार सुरूच


छाया - विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले तालुक्यातील मुळा पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसाने मुळा नदीवरील अंबित पाठोपाठ आता पिंपळगाव खांड धरण ओव्हरफ्लो झाले आहे.

मुळा नदीवरील १९३ दशलक्ष घनफूट क्षमतेचे आंबित धरण तीन दिवसापूर्वी भरले त्यानंतर शुक्रवारी ६०० दशलक्ष घनफूट साठवण क्षमतेचे पिंपळगाव खांड धरण ओव्हरफ्लो झाले या वर्षीच्या पावसाळ्यात अकोल्यातील हे दुसरे धरण भरले आहे पिंपळगाव खांड धरणातील पाणीसाठा आता राहुरी तालुक्यातील मुळा धरणाकडे झेपावला आहे. मुळा नदी पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर टिकून असल्याने मुळेचा प्रवाह कालपासून वाढला यामुळे पिंपळगाव खांड धरण भरले. धरणातील जलसाठा आता नागरिकांचे आकर्षण बनले आहे. परिसरातील या अथांग जलाशयाचे निसर्ग सौंदर्य याकडे लोक आकर्षित होऊ लागले आहे २६ टीएमसी साठवण क्षमतेचे मुळा धरणाकडे आता मुळा नदी पात्रातून आवक सुरू झाली आहे. दरम्यान मुळा पाणलोटात आज मात्र पावसाचा जोर काहीसा वाढला आहे.

# संगमनेरात तहसीलदारांच्या गाडीलाच ठोठावला दंड

युवावार्ता (प्रतिनिधी)

शहरातील वाहतुकीचा बोजवारा हा काही नवीन विषय राहिलेला नाही. नियमांचे पालन करण्याचा उपदेश सर्वसामान्यांना केला जातो. मात्र, अनेकदा सरकारी, प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून नियम पायदळी तुडवले जात असल्याचे समोर येते. मात्र, त्यांच्यावर कारवाई होताना दिसत नाही. असाच प्रकार शहरात घडला. तहसीलदार धीरज मांजरे यांचे वाहन चालकाने भररस्त्यात उभे करून वाहतुकीला अडथळा निर्माण केला. मात्र, यावेळी परिवहन विभागाने आपले कर्तव्य बजावत तहसीलदार मांजरे यांच्या वाहनावर कारवाई करत पाच आकडी दंड ठोठावत नियम सर्वांसाठी समान असल्याचा संदेश दिला.

नवीन अहिल्यानगर रोडवर नित्यनेमाने आंदोलने, मोर्चे आणि विविध मागण्यांसाठी नागरिकांची कायम वर्दळ असते. अशावेळी वाहतूककोंडी टाळण्यासाठी वाहनांना प्रवेशबंदी केली जाते. मात्र, याच नियमांना हरताळ फासत तहसीलदारांचे वाहन चालकाने रस्त्यात कडेला उभे केल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला. यामुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला. अखेर परिवहन विभागाने कारवाईचा बडगा उगारत दंडाची पावती फाडली. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्यास सर्वसामान्य वाहनचालकावर तत्काळ कारवाई होते; पण अधिकाऱ्यांबाबत अनेकदा मवाळ भूमिका घेतली जाते, अशी भावना नागरिकांमध्ये नेहमीच दिसून येते.

परंतु या कारवाईचे स्वागत होत असले, तरी शहरातील बेशिस्त वाहतुकीला जबाबदार असलेल्या यंत्रणेलाच शिस्त कधी लागणार, असा संतप्त सवालही नागरिक उपस्थित करत आहेत. नियमांचा धाक सर्वांसाठी समान असेल, तरच संगमनेरची वाहतूककोंडी आणि बेशिस्तीचा प्रश्न मार्गी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
✻ कर्ज रक्कम वाढ | ✻ कर्ज व्याजदर कमी | ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
किडनीच्या आजारांवर संगमनेरमध्ये परिपूर्ण उपचार
डायलिसीस उपलब्ध सुविधा
अत्याधुनिक मशिनरीद्वारे डायलिसीस
• 24x7 Technician
• One Time Blood Tubing Use
• Modern Dialysis Centre
• Nephrologist, AVF Surgery
• Renal Dialysis
• Dialysis Catheter Insertion
स्पेशालिस्ट - डॉ. नागेश अघोर (किडनीविकार तज्ज्ञ) MBBS, MD, DNB, MNAMS
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ ७०३८२७०३८२




अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
♦ मासिक पाळीच्या तक्रारी ♦ योनी मार्गाची दुर्गंधी
♦ अंगावरून पांढरे जाणे ♦ गुप्त अंगाला खाज
♦ गर्भ न रहाणे ♦ विविध त्वचा विकार
♦ वारंवार गर्भपात होणे ♦ गुप्तरोग, गर्मी
♦ गर्भाशयात गाठी ♦ लघवीला जळजळ
♦ गर्भाशयाचा कर्करोग ♦ संभोगात रस न येणे
♦ स्तनांची वाढ न होणे ♦ संभोगा विषयीची भीती
♦ स्तनातून दूध न येणे ♦ हस्तमैंथूनाची सवय
♦ स्तनात गाठी ♦ लैंगिक विकृती
♦ स्तनाचा कर्करोग ♦ मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
KH स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25